## प्रकरण १ ले

# स्तंभलेखन : प्रेरणा, स्वरूप व व्याप्ती

# प्रकरण १ ले

# स्तंभलेखन : प्रेरणा, स्वरूप व व्याप्ती

## प्रस्तावना

वृत्तपत्राचे महत्त्व आज अनन्यसाधारण असे आहे. वृत्तपत्र केवळ बातमीपत्र नसते तर सामान्य संसारी व्यक्तीपासून ते लेखक, विचारवंत, राजकारणी, समाजसुधारक अशा विविध स्तरावरील सर्व व्यक्तींच्या दैनंदिन व्यवसायात महत्त्वाचे ठरते. त्याचबरोबर अनेकांच्या गरजा भागवणारे साधन आहे. वृत्तपत्रामधून येणाऱ्या अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय तसेच स्थानिक बातम्या समजतात. तसेच अशा बातम्यात येणाऱ्या घटनांच्या मागील 'घटना' कारणमीमांसा आणि त्याच्यापुढे होणारे परिणाम समजतात. समाजातील बऱ्यावाईट घटना समजतात. त्याचबरोबर संपादकीय स्फूट लेखन यामधून अनेक विषय वाचकांसमोर येत असतात.

बातम्याखेरीज वृत्तपत्रीय लेखनामध्ये महत्त्वाचे स्थानअसते ते वार्तापत्रे, सदर, स्तंभलेखन यांना. त्यातील स्तंभलेखन हा प्रकार अलिकडील काही वर्षात लोकप्रियता पावलेला आणि वाङ्मयीन दर्जा असणारा लेखन प्रकार आहे. प्रारंभी वृत्तपत्रातून आणि नंतर पुस्तकरूपाने प्रकाशित झालेल्या स्तंभलेखनाला शंभर वर्षाची परंपरा लाभलेली आहे. १८८६ पासूनच विविध वृत्तपत्रातून व नियतकालिकातून विविध प्रकारचे स्तंभलेखन गाजले. अजूनही विविध वृत्तपत्रातून अशा प्रकारचे स्तंभलेखन होते. हे सर्व लक्षात घेऊनच स्तंभलेखनाचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. वृत्तपत्राचे वाढते महत्त्व, स्तंभलेखनाचा इतिहास, मराठी वृत्तपत्रातील स्तंभलेखनाची वाटचाल, प्रेरणा, संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती यांचा विचार प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

## स्तंभलेखनाची वाटचाल

### १. वृत्तपत्राचे वाढते महत्त्व

वृत्तपत्र हे ज्ञान आणि माहिती मिळवण्याचे प्रमुख माध्यम आहे आणि म्हणूनच रोजच्या जीवनामध्ये वृत्तपत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आणि सर्वमान्य आहे. रोज जगात कुठे काय घडले आहे आणि जगापासून ते आपल्या शहरापर्यंत किंवा गावामध्ये काय घडले हे आपल्याला घरपोच येऊन सांगणारे वृत्तपत्र आपला मित्र बनले आहे. म्हणून वृत्तपत्र हे जनसंवादाचे महत्त्वाचे साधन आहे. लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या देशामध्ये तर वृत्तपत्राचे महत्त्व निश्चितच मोठे आहे. रोज सकाळी गरम चहा आणि ताजे वर्तमानपत्र ही आता लोकांची सवय बनली आहे. हातात

वृत्तपत्राचा अंक असेल तर आपला चहा लज्जतदार बनतो. वृत्तपत्राचा अंक येण्यास उशीर झाला तर चहाची लज्जत कमी होते. विचार करणाऱ्या, शिकलेल्या, विवेक जागा असलेल्या समाजाची वृत्तपत्र ही एक आज सांस्कृतिक व सामाजिक गरज बनली आहे. शिक्षण देणे, प्रबोधन करणे, प्रबोधनासाठी पूर्व तयारी करणे, माहिती पुरवणे, मनोरंजन करणे यादृष्टीनेही वृत्तपत्राचे स्थान मोठे आहे. त्याबरोबर फक्त बातम्या पुरवण्याचे साधन नव्हे तर आपले गाऱ्हाणे मांडण्याचे लोकशाही मार्गावरचे हक्काचे साधन म्हणून सर्वसामान्य नागरीक वृत्तपत्राकडे पाहतात. विशेषत: भारतासारख्या विकसनशील देशातील वृत्तपत्राची जबाबदारी फार मोठी आहे.

गेल्या काही वर्षात वृत्तपत्राचा वेळापत्रकाला मागे सारणाऱ्या, ताज्या बातम्या आणि मनोरंजनाचा अखंड ओघ असणाऱ्या दूरचित्रवाहिन्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सुरू झाल्या आहेत. पण तरीही या सर्वांशी स्पर्धा करीत वृत्तपत्रे आजही तितक्याच जोमाने उभी आहेत. किंबहुना या स्पर्धेच्या युगातही वृत्तपत्राचे महत्त्व तसूभरही कमी झालेले नाही. हे लक्षात घ्यायला हवे. आजही बहुसंख्य लोकांशी संवाद साधण्याचे आणि संपर्क साधण्याचे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम वृत्तपत्र हेच आहे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात प्रभावी स्थान निर्माण केले असले तरी छापील शब्दांची विश्वासार्हता आजही कायम आहे. अहोरात्र सुरू असणाऱ्या या वृत्तवाहिन्यांचा वृत्तपत्रांच्या खपावर यत्किंचितही परिणाम झालेला नाही. वृत्तपत्राचे खप वाढत असल्याची आकडेवारी त्याचा स्पष्ट संकेत देते. आपली लोकप्रियता कायम ठेवण्यासाठी आणि वाचकाला आकर्षित करून घेण्यासाठी जगातल्या एकूण जनजीवनाप्रमाणे वृत्तपत्रांचे स्वरूपही झपाट्याने बदलू लागले आहे. केवळ बातम्या आणि माहिती देऊन आता वृत्तपत्रे थांबत नाहीत. तर आजच्या वृत्तपत्रांनी अधिक संवादी भूमिका घेतली आहे. त्यामुळे वृत्तपत्राचा चेहरा-मोहरा बदलला आहे.

आज वृत्तपत्राची मांडणी, आकर्षकता, रंगरंगोटी अधिक आकर्षक बनली आहे आणि त्याचवेळी आतले मूलतत्त्वही समृद्ध होत आहे. त्यामुळे सर्वच वृत्तपत्राच्या एकूण स्वरूपातही वेगळेपण जाणवू लागले आहे. त्यामुळे वृत्तपत्रातील बदल हा वरवरचे नसून आतूनही आहे.

वृत्तपत्रांनी केवळ माहितीच्या बातम्या देणे महत्त्वाचे मानले नाही तर माहिती आणि ज्ञानाच्या शोधात असणाऱ्या वाचकाला माहिती टप्प्यावरून पुढे नेण्याचा प्रयत्न वृत्तपत्रातील लेखनाचे नवनवे प्रकार निर्माण होत आहे. हा बदल सामाजिक गरजेतूनच निर्माण झालेला आहे.

या प्रयत्नांचा भाग म्हणूनच बातम्याच्या जोडीनेच बातम्याच्या स्वरूपातला मजकूरासोबत जो अन्य मजकूर वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत असतो त्याला आता महत्त्व दिले जात आहे. अशा मजकूरामध्ये ज्याला वाचकांची मिळते. अशा लेखनामध्ये (News Feature), वृत्तलेख मुलाखत (Interview Feature), वृत्तपत्रीय समीक्षात्मक लेखन, विविध सदरे पुरवठ्यासाठी लेखन यांसारख्या लेखनाबरोबरच स्तंभलेखन (Column-Writing) हा लेखनप्रकार महत्त्वाचा आहे. किंबहुना आजच्या सर्वच वृत्तपत्रात, नियतकालिकात या लेखनप्रकाराला विशेष स्थान प्राप्त झाले आहे.

## २. स्तंभलेखनाचे महत्त्व

आज वर्तमानपत्रामध्ये स्तंभलेखन विलक्षण लोकप्रिय ठरले आहे. बातम्यांच्या इतकेच महत्त्व आज स्तंभलेखनाला आहे. स्तंभलेखन हा वृत्तपत्रीय लेखनाचा आगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. केवळ ललित अथवा चटपटीत शैलीत किंवा आकर्षक भाषेत जे लेखन नियमितपणे केले जाते. तेवढेच नाही, तेवढेच स्तंभलेखन नाही. तर विविध स्तंभलेखकांनी, विविध विषयांवर, वेगवेगळ्या शैलीत केलेले स्तंभलेखन पाहिल्यावर लक्षात येते की, आज स्तंभलेखनाच्या परिघाचा विस्तार झालेला आहे. हलक्या-फुलक्या, उपरोधिक चटपटीत लेखनाबरोबरच गंभीर स्वरूपाचे तत्त्वचिंतनात्मक, टीकाटिप्पणी करणारे लेखनही आज स्तंभलेखनातून केले जाते.

विविध सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांची प्रस्तुता (Relevance) हा या स्तंभलेखनाचा फार मोठा हेतू आहे. स्तंभलेखनाचे वाचन केवळ रंजनपर नसते तर वाचकाला विचार प्रवणही करते कारण राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात भाष्य करणारे, टीका करणारे स्तंभलेखन आज मोठ्या प्रमाणावर होत आहे. अनेक वृत्तपत्रात स्तंभलेखकांची यादीही वाचकांच्या आकर्षणाचा विषय राहिली आहे. एखाद्या वृत्तपत्रातील विशिष्ट स्तंभलेखकाचे लेखन ही त्या वृत्तपत्रातील ओळख बनते. वृत्तपत्राचा चेहरा बोलका करण्यात अशा स्तंभलेखनाचे विशिष्ट महत्त्व असते. त्यातून वाचक जोडले जातात. वाचक वाढू लागतात. त्यामुळे विविध विषयांवर लिहिणारे आणि वाचकांशी संवाद साधणारे लेखक घेऊन अनेक चांगली मान्यवर वृत्तपत्रे स्तंभलेखनाबाबत आपली जागरूकता दाखवतात. चांगल्या स्तंभलेखकांचा फायदा वृत्तपत्रांना होतो. अगदी खप वाढण्यापर्यंत होतो असे डेव्हीड स्टीफनसनने आपल्या 'हाऊ - टू सक्सीड इन न्यूजपेपर जर्नालिझम' या पुस्तकात स्पष्टपणे नमूद केले आहे.[१] स्तंभलेखनाचा वृत्तपत्रांना कोणता फायदा होतो याबाबत स्टीफनसनने पुढील गोष्टी सांगितल्या आहेत :-

१) स्तंभलेखनाने वृत्तपत्राला स्वतःचा एक चेहरा देता येतो.

२) मान्यवर लोकप्रिय लेखकांच्या स्तंभलेखनाने त्या वृत्तपत्राची एक प्रतिमा दृढ होते.

३) काही स्तंभ वाचण्यासाठीच वाचक वृत्तपत्र विकत घेतात.

४) स्तंभलेखनातील अनेक विषयामुळे वाचकांच्या प्रतिक्रिया, मत-मतांतरे यांना संपादक प्रोत्साहन देतात.

५) स्तंभलेखनात लेखकाची शैली लेखनाच्या आशयावर मात करते. ती त्याची ओळख बनते.

६) हलकी-फुलकी भाषा आणि अवती-भवतीच्या जीवनातील उदाहरणे हे स्तंभलेखनाची वैशिष्ट्ये त्याला वाचकांच्या जवळ घेऊन जाते. त्याचा वृत्तपत्राला फायदा होतो.

७) स्तंभलेखनात स्थानिक विषयापासून ते आपल्या मनातील अनेक सुप्त गोष्टींपर्यंत अनेक विषयांचा समावेश होऊ शकतो. [२]

स्तंभलेखनाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊनच अनेक आघाडीच्या वृत्तपत्रांनी स्तंभलेखनाला महत्त्व द्यायला सुरूवात केली आहे आणि यशस्वी स्तंभलेखकांमुळे वृत्तपत्रांनाही त्याचा फायदा होत असल्याचे दिसून येते.

## ३) स्तंभलेखनाची वाटचाल

मराठीमध्ये स्तंभलेखन हा प्रकार अलिकडे लोकप्रिय झाला असला तरी स्तंभलेखन हा शब्द न वापरता स्तंभलेखन सदृश्य निबंध स्वरूपातील लेखन मराठीमध्ये जवळपास दिडशे वर्षापासून लिहिले जात आहे.

अमेरिकेत 'स्तंभलेखन' अत्यंत लोकप्रिय लेखनप्रकार आहे. सुमारे शंभर वर्षापूर्वी म्हणजे १८९० मध्ये 'शिकागो डेली' या वृत्तपत्रातून 'शार्प्स अॅण्ड फ्लॅटस' या मथळ्याखाली 'युनीज फिल्ड'ने लिहायला सुरूवात केली ते स्तंभलेखन या स्वरूपात झालेले पहिले लेखन होय. स्तंभलेखन म्हणून लिहिण्याचा प्रारंभ होय. १९३० नंतर वॉटर लिपन यांनी स्तंभलेखन हे नाव आणि प्रकार अत्यंत लोकप्रिय केला. त्यानंतर 'जॅक अॅन्डरसन' सारख्या लेखकांचे स्तंभलेखन गाजले. [३]

त्यानंतर पाश्चिमात्य जगतातील वृत्तसृष्टीत आणि कालांतराने भारतीय वृत्तपत्रीय जगतातही विशेष महत्त्वाचे आणि दैनिक वर्तमानपत्राचे आविभाज्य व आवश्यक असे अंग स्तंभलेखन हे मानले गेले आहे. आजही सर्व प्रमुख आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, इंग्रजी, हिंदी, मराठी दैनिकात रोजच्या

अंकात स्तंभलेखनाला आवर्जुन स्थान दिले जाते. उदा. 'न्यूयॉर्क टाईम्स', 'वॉशिंग्टन पोस्ट', 'गार्डियन टाईम्स' या आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांपासून ते 'द हिंदू', 'टाईम्स ऑफ इंडिया' पर्यंत स्तंभलेखनाचे वेगळे रूप पहायला मिळते.

हिंदी वृत्तपत्रांमधून विख्यात हिंदी प्रहसनकार हरिशंकर परसाई यांनी देखील हिंदी दैनिकातून केलेले स्तंभलेखन आजही लोक आवडीने वाचतात. हरिशंकर परसाई यांची उपरोधिक शैली, सांगण्याचा बाज यामुळे त्यांचे लेखन आजही वाचनीय ठरले आहे. त्यांचे अनेक ग्रंथही तयार झालेले आहेत. कबीरांच्या दोह्यांचा आधार घेत समकालीन स्थिती-गतीवर भाष्य करणारे स्तंभलेखन करीत असत. अशा प्रकारचे स्तंभलेखन हे कधीही कालबाह्य न होणारे असते.

भारतीय वृत्तपत्र सृष्टीत स्वत:ची वेगळी शैली ठेवून लिहिणारे स्तंभलेखक हे तर वृत्तपत्राच्या इतिहासात स्वत:चे असे स्थान निर्माण करून आहेत. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन, आर्थिक या विषयावर स्तंभलेखन करणाऱ्यांची मोठी परंपरा भारतीय वृत्तपत्र इतिहासात पहायला मिळते. इंग्रजी वृत्तपत्रात खुशवंतसिंग, कुलदीप नायर, एम. व्ही. कारंथ, प्रफुल्ल बिडवाई, तवलीनसिंग, शोभा डे, मंजुळा पद्‌मनाथन, सच्चिदानंद मूर्ती, एम. जे. अकबर, दिलीप पाडगांवकर यांच्यासारख्या स्तंभलेखकांचे स्तंभलेखन नियमितपणे सुरू असते व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण स्तंभलेखनाने स्वत:चे असे स्थान निर्माण केले आहे.

## ४) मराठी स्तंभलेखनाची वाटचाल

मराठी वृत्तपत्र सृष्टीत दीडशे वर्षांची खूप जुनी परंपरा लाभलेली आहे आणि त्याचबरोबर हा खूप जुना वृत्तपत्रीय लेखनप्रकार आहे. आज स्तंभलेखनाचे स्वरूप काही समकालीन प्रश्नावरचे लेखन असे झाले असले तरी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात समान प्रबोधनाचा, सामाजिक जागृतीचा धागा बळकट होता असे लक्षात येते.

मराठी वृत्तपत्राचे प्रवर्तक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्यानंतर 'प्रभाकर' हे साप्ताहिक १८४१ साली सुरू झाले. साप्ताहिक 'प्रभाकर'च्या अंकात लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख नित्यनियमाने १८४८ पासून 'शतपत्रे' लिहित असत. ही प्रसिद्ध व लोकप्रिय झालेली शतपत्रे ही मराठी वृत्तपत्रातील स्तंभलेखनाची सुरूवातच म्हणायला हवी. पण त्यावेळी अशाप्रकारच्या लेखनाला स्तंभलेखन न म्हणता 'सदर लेखन' म्हटले जात असे. प्रबोधन करण्याचे, समाजसुधारणा करण्याचे, स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम आणि कर्तव्य हे दोन्ही आपल्या लेखनाद्‌वारे

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR. LIBRARY

लोकहितवादींनी केले. समाजसुधारणेचा विचार मांडणाऱ्या या स्तंभाने महाराष्ट्रात काय क्रांती झाली हे ज्ञात आहे.

गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन हे साप्ताहिक चालवत होते. या साप्ताहिकाचा बाज मुख्यत: परखड व सामाजिक सुधारणांना प्राधान्य देणारा होता. त्यामध्ये शतपत्रे स्वाभाविकरित्या झाली. विशेष म्हणजे शतपत्रांचा गौरवपूर्ण उल्लेख २० शतकाच्या पूर्वार्धात प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी केला. प्रबोधनकारांनी 'लोकहितवादी' नावाचे साप्ताहिकच सुरू केले होते.

प्रबोधनकार ठाकरे हे स्वत:च एक यशस्वी आणि लोकप्रिय स्तंभलेखक होते. शिवाय भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शतपत्रांचा गौरव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' या आपल्या नियतकालिकात शतपत्रे पुन्हा प्रसिद्ध केली. या पत्रातील सामाजिक सुधारणा समाजाने लक्षात घेतल्या असत्या तर आज परिवर्तन सुकर झाले असते. असे गौरवोद्गार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले होते. मराठीतील सुरूवातीचे स्तंभलेखनच असे दर्जेदार आणि कालमर्यादा ओलांडून तत्कालिकतेवर मात करणारे होते.

त्याआधी 'दर्पण'मध्ये काही सदरे होती पण त्याला स्तंभलेखन म्हणता येणे अवघड आहे.

प्रभाकर नंतर केसरी, सुधारक ही वृत्तपत्रे येतात. यापूर्वी 'ज्ञानप्रकाश' आणि 'संदेश' या वृत्तपत्रांनी स्तंभलेखनास स्थायी स्वरूप दिल्याचे दिसते. 'ज्ञानप्रकाश'कार काकासाहेब लिमये आणि 'संदेश'कार अच्युतराव बळवंत कोल्हटकर यांच्याकडे आधुनिकता, नाविन्य होते. 'ज्ञानप्रकाश' मध्ये नाटक, चित्रपट, संगीत, क्रीडा, शेती अशा अनेक विविध विषयांवरील स्तंभलेखन प्रसिद्ध होत असे.

'संदेश'कार अच्युतराव कोल्हटकरांची 'वत्सला वहिनींची पत्रे', हरिभाऊ आपटे यांच्या 'करमणूक' पत्रातील 'सगुणाबाईंची मुलीस पत्रे' किंवा 'गोविंद रावांची मुलास पत्रे' अशा स्वरूपात प्रारंभीच्या काळात हे स्तंभ गाजले. सामाजिक आणि राजकीय विषयावरील चिकित्सक विचार व भाष्य 'संदेश'चा वत्सला वहिनींची पत्रांतून प्रकट होई. हे सदर स्वत: कोल्हटकर व न्यायमूर्ती तुळजापूरकर लिहित असत.

केसरीतही लघुनिबंध, खेळ व खेळाडू, शेतकरी इत्यादी सदरे व त्यातून स्तंभलेखन होऊ लागले. हळूहळू त्यांचे अनुकरण इतर वृत्तपत्रांतूनही होऊ लागले. ठिकठिकाणच्या वृत्तपत्राचे सदरही नियमित येऊ लागले. ही पद्धत पुढे चांगलीच रूजली.

केसरीनंतर 'सकाळ', 'लोकसत्ता' या वृत्तपत्रांच्या संपादकांनी स्तंभलेखनासाठी त्याचा पुरेपूर वापर केला. चांगल्या, दर्जेदार, अभ्यासू, नामवंत लेखकांना लिहिते करून या वृत्तपत्रांना वाचकांना दर्जेदार स्तंभलेखनाचा आस्वाद दिला. नंतर 'महाराष्ट्र टाईम्स', 'तरुण भारत', 'लोकमत' या व अशा अनेक प्रसिद्ध वृत्तपत्रातून स्तंभलेखन हे वृत्तपत्राचे आवश्यक अंग बनले.

## स्तंभलेखनाची संकल्पना

स्तंभलेखन हे इतर वृत्तपत्रीय लेखनापेक्षा वेगळे आहे. त्याचे हे वेगळेपण आणि स्तंभलेखनाची संकल्पना पुढे मांडण्यात आली आहे.

### १) सदर लेखन आणि स्तंभलेखन

वर्तमानपत्रात अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या प्रसिद्ध होतात पण या बातम्या सोडून वाचकांना जे हवे असते त्यामध्ये संपादकीय, वृत्तलेख, मुलाखत लेखन, समीक्षात्मक लेखन या सर्व लेखनाबरोबरच वाचकांना आवडणारे लेखन प्रकार म्हणजे स्तंभलेखन किंवा सदरलेखन होय.

स्तंभ आणि सदर यातील सीमारेषा पुसट आहेत. बहुतेक वेळेला स्तंभलेखनाचा उल्लेख आणि निर्देश 'सदर' म्हणूनच केला जातो. कारण सदर नियमित प्रसिद्ध होते तसेच स्तंभलेखनही नियमित प्रसिद्ध होते. आधी स्तंभलेखनातून प्रसिद्ध झालेले लेखन नंतर पुस्तकरूपात प्रसिद्ध करतानाही बहुतेक स्तंभलेखकांनी आपल्या लेखनाचा उल्लेख 'सदर लेखन' म्हणूनच केला आहे. उदा. विजया राजाध्यक्ष (तळ्यात-मळ्यात), गंगाधर गाडगीळ (पाण्यावरची अक्षरे), माधव गडकरी (चौफेर) इत्यादी.

सदरलेखन आणि स्तंभलेखन यात फरक करणे अवघड आहे. काही वेळा नियमित प्रसिद्ध होणाऱ्या लेखांनाही स्तंभलेखन म्हणून संबोधले जाण्याची शक्यता असते, कारण हे लेख ही वर्तमानपत्रातून विशिष्ट दिवशी विशिष्ट पानावर प्रसिद्ध केले जातात. पण स्तंभलेखन या शब्दातील स्तंभ या शब्दाला फार महत्त्व आहे. हा शब्दच स्तंभलेखनाला वेगळे ठरवण्यासाठी उपयुक्त ठरतो. लेख हा विस्ताराने लिहिलेला असतो. जर वृत्तपत्राचे निम्मे पान भरून तो लेख असेल तर त्याला स्तंभ म्हणता येणार नाही.

वाङ्मयातील कथा, कादंबरी, कविता, ललित लेखन यांची काटेकोर, निश्चित व्याख्या आपण सांगू शकत नाही. परंतु वाङ्मयातील हा प्रत्येक लेखनप्रकार आपण भिन्न भिन्नपणे ओळखू शकतो. त्याचे वर्गीकरण करू शकतो. त्याच पद्धतीने स्तंभ आणि सदर या दोन संकल्पनांचीही

निश्चितपणे व्याख्या सांगता येत नसली तरी, एकाच व्यक्तीचे लेखन तो 'स्तंभ' तर एकाच वेळी किंवा अनेक व्यक्तींनी वेळोवेळी लिहिलेले परंतु एकाच ठरावीक विषयावरील मजकूर ज्यात येतो ते सदर असे स्थूलपणे म्हणता येईल.

वृत्तपत्रामध्ये अनेक विषयांवरील अनेक सदरे दैनंदिन प्रसिद्ध होत असतात. महिलांचे सदर, मुलांचे सदर, युवाविश्व, मूल्यशिक्षण, दिनमान, क्रीडा सदर, दिनविशेष, बोधकथा, इंग्रजीशी तोंडओळख, मुलांचे पान, सुटीचे पान, अर्थकारण आणि गुंतवणुकी विषयक माहिती देणारे सदर, वाचकांचा पत्रव्यवहार, शालेय विश्व आणि वेगवेगळी सदरे वृत्तपत्रात असतात. त्यासाठी विशिष्ट प्रकारे लेखन करणारे लेखक असतात. महिला, मुलांसाठी त्यांच्या भाषेत लेखन करणारे, त्यांचे प्रश्न मांडणारे लेखन हवे असते, तर क्रीडाविषयक लेखन करणाऱ्यांना विविध खेळ, खेळाडू यांची माहिती व त्यातील ताज्या घडामोडी यांच्याविषयी लिहावे लागते.

**सदरलेखन**

'वृत्तपत्रामध्ये विशिष्ट जागी विशिष्ट विषयावरील मजकूर येतो त्यास सदर म्हणतात.'[५] किंवा 'नियमितपणे विशिष्ट वाचक वर्गासाठी किंवा वाचकांच्या एका गटासाठी ठराविक प्रकारचा मजकूर दिला जातो त्याला सदर म्हणतात.'[६] अशी संकल्पना सदर लेखना संदर्भात वापरली जाते. सदरलेखनातील मजकूर एकच व्यक्ती लिहिते असे नाही तर वेगवेगळ्या लेखकांनी त्या एकाच सदरलेखनाचा मजकूर लिहिलेला असतो. अशावेळी सदरलेखन करणाऱ्या लेखकांची नावे प्रसिद्ध होतातच असे नाही. याउलट,

**स्तंभलेखन**

'जेव्हा एकच व्यक्ती वेगवेगळ्या विषयांवर सातत्याने लिहिते तेव्हा त्यास स्तंभलेखन म्हटले जाते किंवा इंग्रजीत त्याला कॉलम राइटिंग असे संबोधतात.'[६]

नियमितपणे केले जाणारे स्तंभलेखन एकच लेखक एकच स्तंभ लिहित असतो. त्या लेखकाचे नाव प्रसिद्ध केले जाते. तसेच एकाच स्तंभलेखनामध्ये विविध विषय एकच लेखक हाताळू शकतो. त्याच्यावर विषयाचे बंधन नसते मात्र शब्द मर्यादेचे बंधन असते म्हणूनच स्तंभलेखन या शब्दातील 'स्तंभ' हा शब्द महत्त्वाचा ठरतो. वृत्तपत्राच्या पानांच्या मांडणीमध्ये एका पानावर साधारणत: सहा ते आठ स्तंभ (कॉलम) असतात. एकाच पानावर जास्तीत जास्त दोन ते अडीच किंवा तीन कॉलम्समध्ये स्तंभ लिहिला जातो म्हणून त्याची शब्द मर्यादा साधारणत: आठशे ते बाराशे शब्दांपर्यंत

किंवा जास्तीत जास्त क्वचित पंधराशे शब्दापर्यंत असते. ही सर्व वैशिष्ट्ये स्तंभलेखनाची असली तरी ती स्थूलमानाने आहेत. काटेकोर पद्धतीने ती प्रत्येक स्तंभलेखनाला लागू होतील असे नाही. परंतु वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणारे लेख, सदरे किंवा अन्य लेखन आणि स्तंभलेखन यातील भेद लक्षात येण्याकरीता ही वैशिष्ट्ये उपयुक्त ठरतात.

## २) स्तंभलेखन आणि संपादकीय लेखन

वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ लेखन स्तंभातून केले जाते तसेच स्तंभामध्ये त्या त्या वेळी घडलेल्या घटना, प्रसंग यांच्यावर भाष्यही केले जाते आणि अशा प्रकारचे स्तंभलेखन जवळपास सर्वच वृत्तपत्रातून केले जाते. काही स्तंभ एखाद्या विषयावर वाचकांना मार्गदर्शन करण्याचे कामही करतात. हे लक्षात घेऊन बऱ्याच वृत्तपत्रातून स्तंभलेखनाला संपादकीया इतकेच महत्त्व दिले जाते. म्हणून स्तंभलेखनाला सेकंड ऐडिटोरीयल असेही म्हटले जाते. काही वेळा एकाच दिवशी दोन किंवा तीन महत्त्वाच्या घटना अशा घडतात की त्यावर विस्तृतपणे वाचकांशी चर्चा करणे आवश्यक असते. परंतु संपादकीयांची शब्दमर्यादा लक्षात घेता सर्व घटना-प्रसंगाचा स्पर्श करणे संपादकीयामध्ये शक्य होत नाही. अशावेळी एखादा स्तंभलेखक आपल्या लेखनामध्ये त्याचे विवेचन करतो. अर्थात संपादकीयामध्ये व्यक्त झालेले मत हे त्या वृत्तपत्राचे, त्या वृत्तपत्रसंस्थेचे धोरण किंवा मत असते तर स्तंभलेखनात व्यक्त झालेले विचार हे सर्वस्वी स्तंभलेखकाचे व्यक्तिगत विचार असतात.

संपादकीय लेखन हे भारदस्त, ससंदर्भ, समाजहित लक्षात घेऊन केलेले अशा स्वरूपाचे असते. स्तंभलेखकाच्या कामाचे स्वरूप पाहता अग्रलेख किंवा संपादकीयाशी त्याची तुलना करणे थोडे अवघड काम आहे. या दोन्ही लेखकांच्या जाती मूलत:च भिन्न टोकाच्या असतात. स्तंभलेखन कधी वैचारिक साधे-सरळ स्फूट ललित तर कधी उपरोधिक स्वरात लिहिलेले असते.[७] स्तंभलेखनाला साधारणत: कोणताही विषय वर्ज्य नसतो. अग्रलेखाच्या बाबतीत विषयाच्या मर्यादा पडतात.

संपादकीय व स्तंभलेखन या दोन्हीतील टीकेचे स्वरूप भिन्न असते. अग्रलेख किंवा संपादकीयातून एखाद्या घटनेवर, व्यक्तीवर कधी उघडपणे तर कधी उपरोधिकपणे टीकेचा रोख असतो. संपादकीय लेखन हे वैचारिक स्वरूपाचे व माहितीने भरलेले असते. एखादा राजकीय, सामाजिक प्रश्न वाचकाला समजून द्यावा किंवा त्यावर लिहावे अशा हेतूने संपादकीय लिहिले जाते. त्यात सातत्यता, योग्यता पटवून देण्याचा प्रयत्न संपादक करीत असतो. आपली 'बाजू' हीच 'योग्य', 'व्यवहार्य आणि न्याय्य' असा दावाही संपादक करीत असतो.

स्तंभलेखन मात्र या सर्वांपासून दूर असते. या लेखनातील टीका 'टीका' म्हणून येत नाही तर त्या स्तंभलेखकाची ती वैयक्तिक व तितकीच सामाजिक प्रतिक्रिया असते. शिवाय उपहासात्मक पद्धतीने ती व्यक्त होत असते. कोणतीही बाजू मांडण्याचा किंवा मी जे लिहितो आहे तेच सत्य आहे असा दावा स्तंभलेखक कधीही करीत नाही. त्याने तसे करूही नये.

मात्र स्तंभलेखक अशी भूमिका कधीही स्वीकारत नाही. संपादकीय किंवा अग्रलेख वाचताना वाचक शेवटी एखाद्या निश्चित भूमिकेपर्यंत, निष्कर्षापर्यंत किंवा अनुमानापर्यंत पोहचावा असा प्रयत्न संपादकीय लिहिण्यामागे असतो आणि म्हणूनच निष्कर्ष आणि अनुमान ही अग्रलेखाची वैशिष्ट्ये आहेत. तात्पर्य काढण्याची जबाबदारी स्तंभलेखकांवर नसते. गांभीर्य, वैचारिकता, प्रगल्भता हा संपादकीयांचा स्थायीभाव असतो. तर हलकेफुलकेपणा, रंजकता, उपहास किंवा वाचकांना वाचताना आनंद वाटेल, त्यांचे मनोरंजन होईल अशा पद्धतीचे लेखन करून शक्य तेवढे ज्ञान आणि माहिती सहजपणे वाचकांपर्यंत पोहचवणे हा स्तंभलेखनाचा स्वभाव असतो. मात्र हे करताना वाचकांना 'शहाणे' करण्याचा प्रयत्न असतो.

दोन्ही प्रकारच्या लेखनातील आशय आणि शैलीची भिन्नता उघडपणे लक्षात येणारी असते. संपादकीय लेखनामागची भूमिका वस्तुनिष्ठ दृष्टिकोन व्यक्त करणारी असते. तेथे संपादकांच्या व्यक्तिगत विचारांना, भावनांना वाव नसतो.

थोडक्यात स्तंभलेखन हे 'सेकंड ऐडीटोरीयल' असते असे म्हटले जाते आणि तितकेच महत्त्व स्तंभलेखनाला दिले जाते हे खरे आहे. परंतु स्तंभलेखन हे संपादकीयाहून अनेक बाबतीत वेगळे असते असे दिसून येते.

## स्तंभलेखनातील विविध प्रकार

सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, क्रीडाविषयी, वाङ्‌मयीन, समीक्षात्मक, धार्मिक असे अनेक प्रकारचे स्तंभलेखन आढळते. स्तंभलेखनासाठी कोणताही विषय वर्ज्य नाही. किंबहुना स्तंभलेखनातील विविधता हे वाचकप्रियतेचे एक कारण आहे. विषयातील विविधतेबद्दल स्तंभलेखन अनेक प्रकारचे दिसून येते.

एखादा लेखक वाङ्‌मयीन, ललित स्वरूपाचे लेखन करतो. एखादा लेखक गंभीर वैचारिक स्वरूपाचे लेखन करतो. एखादा साध्या सरळ शैलीत खुमासदार लिहितो. एखादा उपहासात्मक पद्धतीने विनोदी लेखन करतो. लेखक स्वतःच्या अशा लेखनशैलीत लिहितो. स्तंभलेखनाचे

विविध प्रकार सांगता येतील. परंतु या सर्व विषयाचे आणि लेखकांच्या शैलीचे विविध प्रकार लक्षात घेऊन स्तंभलेखनाचे सर्वसाधारणपणे पुढील पाच प्रकारात वर्गीकरण करता येते.

## १) गॉसिप कॉलम (कुजबुज स्तंभ)

या प्रकारच्या स्तंभलेखनामध्ये केवळ ऐकीव माहितीवर लेखन होते. अर्थात त्याचे स्वरूप गंमतीचे असते. विशेषत: इंग्रजी वृत्तपत्रामध्ये हा लेखनप्रकार लोकप्रिय आहे. बड्या लोकांच्या खाजगी भानगडींची विशिष्ट चर्चा या स्तंभातून लेखक करीत असतो. बऱ्याच वेळा अशा प्रकारचे स्तंभ चित्रपट, नाट्यविषयक नियतकालिकांतून येतात.

## २) फनी कॉलम (Funny column)

फनी कॉलम किंवा गंमतीशीर स्तंभ या प्रकारच्या स्तंभामध्ये हसत खेळत दुसऱ्याशी चेष्टा करीत स्तंभलेखक लिहितो. वरवरच्या त्यांच्या स्तंभाची लोकप्रियता ठरत असते. देवयानी चौबळ, गिरीष कणेकर, दिलीप प्रभावळकर किंवा लोकसत्ता रविवार या आवृत्तीमध्ये प्रसिद्ध होणारा 'तंबी दुराई' यात लिहिला जाणारा 'दोन फुल एक हाफ' यासारखा स्तंभ. अशा स्तंभातून राजकीय, सामाजिक घटनांवर विनोदी पद्धतीने तर उपहासात्मक पद्धतीने मार्मिक टीका-टिपण्णी केलेली असते.

## ३) विश्लेषणात्मक

एखादी घटना घडल्यानंतर तिचा तपशील वाचकाला कळतो किंवा त्या घटनेसंबंधी जादा माहिती, विशेषवृत्त वृत्तलेखनातून कळते. त्याला Reporting in depth म्हणतात. परंतु ही घटना घडण्यामागे सामाजिक वास्तव, कारणे, तिचा समाजावर होणारा परिणाम आणि त्या घटनेचा पुरेसा तपशील व्यक्त करण्याचे ठिकाण म्हणजे स्तंभलेखन अशा प्रकारच्या स्तंभलेखनाला विश्लेषणात्मक स्तंभलेखन म्हणतात.

## ४) गंभीर वैचारिक स्तंभलेखन

गंभीर आणि वैचारिक स्वरूपाच्या स्तंभलेखनामध्ये भारदस्त विचारप्रवर्तक असे लेखन केले जाते. काही सामाजिक प्रश्न, समस्या यांवर गांभीर्याने लेखन केले जाते आणि समाजाशी ज्या बाबींवर गांभीर्याने बोलणे आवश्यक आहे. अशा बाबींबद्दल चर्चा स्तंभलेखक करीत असतो.

### ५) वाङ्मयीन स्वरूपाचे स्तंभलेखन

अशा स्वरूपाचे स्तंभलेखन विशेषत: विविध वृत्तपत्रांच्या रविवार आवृत्या किंवा वाङ्मयीन स्वरूपाची नियतकालिके यातून प्रसिद्ध होत असते. वाङ्मय विश्वातील घडामोडी, लेखक, प्रकाशक, प्रकाशन विश्व, वाङ्मयीन पुरस्कार, नवी पुस्तके यासारख्या विषयांवर लालित्यपूर्ण भाषेत लेखन केले जाते.

### ६) साईड एडिटोरीयल कॉलम

एखादा स्तंभलेखक नुकत्याच घडलेल्या बातमीवर, घटनेवर मल्लीनाथी, टीका-टिप्पणी करतो. त्यावेळी तो वृत्त टीकाकाराची भूमिका बजावतो त्याला न्यूज कॉमेंट्रेटर असे संबोधतात. त्यातही काही जण फक्त राजकीय घटनांबाबत टीका-टिप्पणी करतात. राजकीय बातम्यांचा आधार घेऊन त्याचे विश्लेषण करतात. त्याच्या मागच्या पुढच्या संभाव्य घटनांबाबत लिहितात. त्यांना राजकीय विश्लेषक म्हणणेच अधिक उचित होईल. ती अशा स्तंभलेखकांच्या लेखनाची शैली असते. या सारखे स्तंभलेखन संपादकीयासारखे भासते. बऱ्याचवेळा अग्रलेखनासारखे संपादक जो विषय निवडेल त्या प्रकारच्या स्तंभलेखकाचे व्यक्तिगत मत प्रगट होत असते. 'साईड एडिटोरयील कॉलम' असेच त्याला म्हणतात.

बऱ्याच घटनांवर 'संपादकीय' एकाच वेळी लिहिता येत नाही. कारण संपादकीय पानांची शब्दमर्यादा लक्षात घ्यावी लागते. पण एकाच दिवशी दोन तीन घटना घडल्या की संपादकीय लिहिले जावू शकते. अशा वेळी स्तंभलेखनाच्या माध्यमातून महत्त्वाच्या घटना वाचकांपर्यंत सविस्तरपणे नेल्या जातात. अशा घटनांना स्तंभलेखनामध्ये प्राधान्याने स्थान दिले जाते.

## स्तंभलेखनाची वैशिष्ट्ये

स्तंभलेखनाची निश्चित आणि काटेकोर व्याख्या करता येत नसली तरी ढोबळमानाने स्तंभलेखनाची काही वैशिष्ट्ये लक्षात येणारी असतात. ज्यामुळे स्तंभलेखन हे इतर वृत्तपत्रीय लेखनापेक्षा वेगळे ठरते अशी स्तंभलेखनाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

### १) नियमितपणा

वृत्तपत्रीय लेखन प्रकारांपैकी बातम्या वगळता इतर लेखनापेक्षा वृत्तलेख, विशेषवृत्त, मुलाखत, लेखन, समीक्षात्मक लेखन, वार्तापत्र हे सारे लेखनप्रकार प्रासंगिक असतात. विशिष्ट घटने संदर्भात किंवा औचित्यासाठी लिहिले जातात. पण स्तंभलेखन मात्र नियमितपणे प्रसिद्ध होत

असते. म्हणून स्तंभलेखनाचा प्रथम विशेष नियमितपणा हाच आहे. याचा विचार करता स्तंभलेखक हा वृत्तपत्रातील अन्य पत्रकारांपेक्षा वेगळा लेखक असतो. खरे तर स्तंभलेखकाला 'विशेष' असा पत्रकार मानायला हरकत नाही. कारण तो सुद्धा नियमितपणे लिहित असतो. ठराविक दिवशी, ठराविक जागी, ठराविक पानावर एखादे स्तंभलेखन प्रकाशित होत असेल तर त्याचा एक वेगळा ठसा वाचकांच्या मनावर उमटलेला दिसतो.

## २) विषयांचे वैविध्य

स्तंभलेखकाच्या लेखन स्वरूपाचा अधिक विचार करता आणखी एक वैशिष्ट्य दिसून येते ते म्हणजे विषयाचे वैविध्य स्तंभलेखकाला आवडणारा कोणताही विषय त्यांच्या स्तंभलेखनाचा विषय होऊ शकतो. त्या कोणत्याही साध्या विषयात 'मोठा आशय' आढळू शकतो. म्हणून स्तंभलेखन विषयाच्या बाबतीत ललित-लघुनिबंधाच्या जवळ जाणारे आहे. वाचकांना आवडेल, रूचेल, पटेल असा कोणताही विषय स्तंभलेखनाचा विषय होऊ शकतो. याशिवाय आपल्या आजुबाजूला समाजात घडणाऱ्या अनेक घटना यासुद्धा स्तंभलेखनाचा विषय होऊ शकतात. मग या घटना सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, क्रीडाविषयक, सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक कोणत्याही विषयासंबंधी असोत.

## ३) शब्दमर्यादा

'शब्दमर्यादा' हे स्तंभलेखनाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. शब्दमर्यादा न पाळता केलेले लेखन 'स्तंभलेखन' न राहता तो 'लेख' होतो. स्तंभलेखन या शब्दातील स्तंभ हा शब्दच महत्त्वाचा आहे. वृत्तपत्राच्या पानाची मांडणी लक्षात घेतली तर प्रत्येक पानावर साधारणत: सहा ते आठ स्तंभ (कॉलम) असतात. वृत्तपत्रीय परिभाषेत त्यापैकी दोन ते अडीच कॉलम्सचे लेखन स्तंभाचे असायला हवे. म्हणजेच स्तंभलेखन हे साधारणपणे आठशे ते बाराशे शब्दापर्यंत किंवा जास्तीत जास्त कधीतरी पंधराशे शब्दापर्यंत असले पाहिजे. यापेक्षा मोठे लेखन स्तंभ न राहता लेख होतो.

या शब्दमर्यादेमुळे लेखकाच्या अभिव्यक्तीवर बंधने येत नाहीत तर तो आपले विचार अधिक रेखीव बांधेसूदपणे कमीत कमी शब्दांत मांडतो. पाल्हाळ न लावता लेखक नेमक्या शब्दात लिहित असल्यामुळे 'अल्पाक्षरमणीयता' हा गुणविशेष त्याला प्राप्त होतो.

### ४) तात्कालिन संदर्भ

स्तंभलेखनाला स्थूलमानाने कोणत्याही विषयाचे वावडे नसते. परंतु त्या लेखनात नुकत्याच घडलेल्या एखाद्या घटनेचा संदर्भ त्या स्तंभलेखनाला अधिक आकर्षक करतो म्हणूनच स्तंभलेखन हे वृत्तपत्रीय लेखन असल्यामुळे त्याला तत्कालिक घटनांचा संदर्भ असणे महत्त्वाचे आहे. सभा, संमेलने, दैनंदिन घटना, बातम्या, राजकीय घडामोडी, सामाजिक घटना यातून सुद्धा स्तंभलेखनाचे विषय मिळत असतात. यातील आवश्यक तपशीलाच्या आधारे स्तंभलेखन ढंगदार, रंगतदार, चुरचुरीत आणि खुमासदार होण्यास मदत होते.

### ५) विषयांच्या ताजेपणा

स्तंभलेखन हे नियमित प्रसिद्ध होणारे वाङ्मय असल्यामुळे वाचकांना प्रत्येक स्तंभामध्ये काहीतरी नवीन हवे असते. रोज किंवा आठवड्यातून एकदा लिहिणाऱ्या स्तंभलेखकाला सतत नवनवीन विषयांचा शोध घ्यावा लागतो. विषयांचा ताजेपणा हे या दृष्टीने स्तंभलेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

### ६) स्तंभलेखकाची व्यक्तिगत भूमिका

स्तंभलेखनामध्ये व्यक्त झालेली मते ही लेखकाची व्यक्तिगत मते असतात. ती साधारण पटवून देण्याचा प्रयत्न स्तंभलेखक करीत असतो. परंतु त्याचवेळी मी सांगतो तेच सत्य आहे, अशी आग्रही भूमिका त्याची नसते. कारण ती मते त्याची व्यक्तिगत मते असतात. स्तंभलेखनातही काही वेळा टीका केली जाते पण ही टीका 'टीका' म्हणून येत नाही तर ती स्तंभलेखकाची वैयक्तिक प्रतिक्रिया असते. ती कधी उघडपणे तर कधी उपहासात्मक पद्धतीने व्यक्त होत असते. लेखकाची ही व्यक्तिगत मते स्तंभातून मांडण्यासाठी संपादकाने त्याला पूर्णपणे स्वातंत्र्य देणे आवश्यक असते. असे स्वातंत्र्य असेल तर स्तंभलेखन दर्जेदार होण्यास मदत मिळते.

### ७) विषयासंबंधी सर्वांग परिपूर्ण माहिती देणे

स्तंभलेखक जो विषय निवडतो त्या विषयाची केवळ माहिती देणे एवढेच त्याचे उद्दिष्ट कधीच नसते. वाचकाला वरवर असणाऱ्या घटना, व्यक्ती, प्रसंग याबद्दलचे भाष्य नव्या, अप्रकाशित माहितीसह सादर करणे स्तंभलेखनात अपेक्षित असते. स्तंभलेखक अनेक साधनांच्या द्वारे अशी माहिती जमा करण्याचा प्रयत्न करतो. घटनेमागील व्यक्ती, संदर्भ यांचे परस्परसंबंध जाणून घेण्याचा तो प्रयत्न करतो. त्यासाठी भेटीगाठी, मुलाखतीही घेतो. पडद्यामागचे आवश्यक तपशील, तो जमा

करतो. त्यामुळे हे लेखन अधिक आकर्षक रंगतदार बनत असते. साध्या वाटणाऱ्या घटनांमधील वेगळेपण शोधणे, उपलब्ध नसलेली माहिती उपलब्ध करून वाचकांना देणे यासाठी स्तंभलेखक प्रयत्नशील असतो.

### ८) अचूक शब्दयोजना

स्तंभलेखन करताना वाचकांचे विविध सामाजिक स्तर, बौद्धिक स्तर आणि त्यांच्या आकलन क्षमतेचे स्तर लक्षात घेऊन स्तंभ लेखकाने अचूक शब्द योजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्थाची हानी किंवा अनर्थ टाळला जाऊ शकतो तसेच शब्द योजनेमुळे स्तंभ लेखनावर असणारे शब्दसंख्येचे किंवा शब्दमर्यादेचे पालन करणे शक्य होते.

### ९) स्तंभलेखनात निष्कर्ष, तात्पर्य अपेक्षित नसते

संपादकीय किंवा अग्रलेखासारख्या लेखनात निष्कर्ष काढले जातात किंवा तात्पर्य वाचकांना सांगितले जाते. पण स्तंभलेखनामध्ये स्तंभलेखकाने एखाद्या विषयांवर आपली मते व्यक्त करावीत अशी अपेक्षा असते. त्याने अंतिम निष्कर्ष किंवा तात्पर्य काढावे अशी अपेक्षा नसते.

### १०) लेखनाची उद्दिष्टये स्पष्ट असावीत

स्तंभलेखन कितीही आकर्षक शैलीने लिहिले तरी त्याचे निश्चित उद्दिष्टये असली पाहिजेत. ही उद्दिष्टये लेखकाने लिहिण्यापूर्वी आपल्या मनाशी निश्चित केली असली पाहिजेत. काय सांगायचे आहे हे जितके महत्त्वाचे तितकेच लेखन का व कुणासाठी करावयाचे आहे हेही महत्त्वाचे आहे.

### ११) स्तंभलेखनात कृत्रिम तत्त्वदर्शन टाळले जाते

स्वभावत: चिंतनशील असलेल्या चिंतनातून, स्वच्छंदी आत्माविष्कारातून वाचकांना तत्त्वदर्शन व्हावे यात अस्वाभाविक असे काही नाही, पण वाचकांना शहाणे करण्यासाठी आपण काही मोठे तात्त्विक सांगतो आहे असे अट्टाहास करून स्तंभलेखकाने लिहू नये. स्तंभ वाचणारे वाचक हे समाजातील सर्व स्तरातील असतात आणि वृत्तपत्र वाचताना त्यातील स्तंभ त्यांनी सहजपणे वाचावा अशी भाषाशैली त्यातील असावी. वाचकांनी कष्ट न करता मुद्दाम न वाचता तो सहजपणे वाचत जाईल अशी ओघवती भाषा त्यात असावी म्हणून स्तंभलेखकाने आपल्या लेखनाला कृत्रिम तत्त्वदर्शनाचा किंवा बोजड भाषेचा मुलामा दिलेला असू नये.

### १२) लेखन सुबोध असावे

वृत्तपत्राच्या वाचकाला, वाचन सुरू असताना व ते पुरे होताच मजकूर चटकन व नेमकेपणाने समजला पाहिजे. वृत्तपत्राचा वाचक हा समाजाच्या कोणत्याही स्तरातील असतो. त्याची वाङ्मयीन समज किंवा आकलन कदाचित मर्यादित असू शकते किंवा लेखनातील काही संदर्भ त्याला माहिती नसण्याचीही शक्यता असते. त्यामुळे स्तंभाचे लेखन हे सुबोध असणे महत्त्वाचे आहे.

### १३) वाक्यरचना सोपी, सुटसुटीत असावी

वृत्तपत्राचा वाचक हा सामान्य संसारी व्यक्ती किंवा ज्याचा साहित्याशी फारसा संबंध नाही अशी व्यक्ती असू शकतो हे लक्षात घेऊन सर्वांना कळेल अशी सोपी सुटसुटीत वाक्यरचना करणे आवश्यक आहे. उगीचच गुंतागुंतीच्या वाक्यांची उतरंड लावली तर वाचकांची केवळ दमछाक होऊन तो मजकूर टाळून पुढे जाईल अशी किचकट, क्लिष्ट वाक्यरचना टाळून सोपी व सुटसुटीत वाक्यरचना असावी. ज्यामुळे वाचक वाचनाच्या प्रवाहाबरोबर संपूर्ण स्तंभ सहजगत्या आकलन करू शकेल.

### १४) स्तंभलेखनाला लालित्याचे अंग असावे

वृत्तपत्रातील इतर मजकूर म्हणजे बातम्या, वृत्तलेख, अग्रलेख हे सारे लेखन वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असते. त्यामुळे त्यात वस्तुस्थितीला धरून म्हणजेच थोडेसे दक्ष स्वरूपाचे लेखन असते. त्यात मनोरंजनाला वाव नसतो. परंतु स्तंभलेखनातून लेखक वस्तुस्थितीला धरून परंतु लालित्यपूर्ण पद्धतीने लेखन करू शकतो. अशा लालित्यपूर्ण शैलीमुळेच वृत्तपत्रातील इतर लेखन आणि स्तंभलेखन यात फरक दिसून येतो.

### १५) स्तंभलेखकाला वाचकांशी संवाद साधण्याची उत्सुकता असावी

वृत्तपत्राचे वाचन करणारा वाचक वेगळ्या अपेक्षेने स्तंभलेखन वाचत असतो. त्यातून त्याला माहिती हवी असते. विचार हवा असतो. परंतु त्याला मनोरंजनही हवे असते. हे लक्षात घेऊन स्तंभलेखकाची भूमिका वाचकांशी संवाद साधण्याची असली पाहिजे. वाचकांशी संवाद साधण्याची लेखकाची उत्सुकता त्याचे स्तंभलेखन अधिक सोपे व आकर्षक करते.

### १६) स्तंभलेखनाचे प्रयोजन

स्तंभलेखनावर कोणत्याही वृत्तपत्रीय लेखनाची तीन प्रयोजने असतात. (१) माहिती देणे (टू इन्फॉर्म), (२) शिक्षण देणे (टू एज्युकेट), (३) मनोरंजन करणे (टू एंटरटेन). वृत्तपत्रीय लेखनाची

ही प्रयोजने मनाशी धरूनच लेखन करावे लागते. तरीसुद्धा स्तंभलेखनातून लेखकाची व्यक्तिगत मते मांडलेली असावी लागतात. स्तंभलेखन म्हणजे लेखकाचा वैयक्तिक दृष्टिकोन असतो. वाचकांना माहिती देताना, शिक्षण देताना किंवा त्याचे मनोरंजन करताना स्तंभलेखकाचे स्वत:ची आवडनिवड, टीका-टिप्पणी, त्यांचा अभिप्राय व मते व्यक्त होणे आवश्यक आहे.

### १७) स्तंभलेखन हे स्तंभलेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रगटीकरण

स्तंभलेखनाच्या स्वरूपाचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे या प्रकारच्या लेखनाच्या अभिव्यक्ती. हे लेखन वैयक्तिक दृष्टिकोनातून लिहिलेले असते. स्तंभलेखकाची स्वत:ची आवडनिवड, स्वत:ची मते त्यात प्रगट होतात. स्तंभलेखक टीका-टिप्पणी करतो. एखाद्या घटनेवरील त्याचा अभिप्राय व्यक्त होत असतो. त्यामुळे स्तंभलेखन म्हणजे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रगट रूप असते. अर्थात या लेखनाचा अपरिहार्य परिणाम आहे.

स्तंभलेखनात 'विश्लेषण' ही बाब महत्त्वाची आहे. एखाद्या घटनेतील गुंतागुंत स्पष्ट करताना स्तंभलेखक विश्लेषणात्मक पद्धतीने लिहितो. कित्येकदा तो विशिष्ट विषयाच्या संदर्भात आपले वैयक्तिक मत प्रगट करतो. स्तंभलेखकाला मतांचे, विचारांचे पूर्ण स्वातंत्र्य बहुतेक वेळेला त्याच्या वृत्तपत्राने म्हणजे मालकाने किंवा संपादकाने दिलेले असते. त्यामुळे अशा वैयक्तिक, अभिप्रायात्मक लेखनाला स्तंभलेखनात वाव असतो.

## वृत्तपत्रीय लेखनाची आणि स्तंभलेखनाची भाषा

वृत्तपत्रातील कोणत्याही लेखनात भाषेचे महत्त्व सर्वाधिक असते. किंबहुना भाषा हा वृत्तपत्रांचा एकमेव आधार व बलस्थान असते. भाषेशिवाय वृत्तपत्रीय लेखन ही शक्यताच संभवत नाही. वृत्तपत्रांचा वाचक हा सर्वसामान्य नागरिक असतो हे लक्षात घेऊन वृत्तपत्रीय लेखनाची किंवा स्तंभलेखनाची भाषा साधी, सोपी व नेटकी असावी लागते.

मात्र मराठी स्तंभलेखकाचा किंवा एकूणच मराठी वृत्तपत्रीय लेखनाचा इतिहास पाहिला असता लक्षात येते की, आरंभीचा काळ संस्कृतप्रचुर, क्लिष्ट आणि बोजड भाषेच्या प्रभावाचा काळ होता. इंग्रजीतील ज्ञान-विज्ञान ऐतद्देशीयांना समजावून सांगणे किंवा वाचकांची अभिरूची घडविणे हे स्तंभलेखकांचे उद्दिष्ट होते. त्यामुळे पुस्तकी किंवा भाषांतरीत भाषा याचा वापर फार होत असे. अशा प्रकारचे लेखन अच्युतराव कोल्हटकरांचे 'संदेश', 'दर्पण' किंवा 'प्रभाकर' यांसारख्या वृत्तपत्रातील स्तंभलेखनात दिसून येते.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी प्रथमच मराठी भाषेच्या प्रकृतीला सुसंगत अशी पल्लेदार गद्यरचना केली. अस्सल मराठी बाज कायम ठेवूनही सूक्ष्म आणि संपन्न विचार व्यक्त करता येतात हे त्यांनी दाखवून दिले. एका अर्थाने विचारवंतांची प्रौढ, सकस मराठी त्यांनी विकसित केली.

त्यानंतरही वृत्तपत्रीय लेखनाची भाषा आणि लोकव्यवहाराची भाषा यामध्ये प्रचंड तफावत पडली होती. या संदर्भात १९३८ साली मुंबईच्या मराठी साहित्य संमेलनात वृत्तपत्रीय भाषा व्यवहारासंदर्भात कै. भास्करराव जाधव यांनी ठराव मांडला होता. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर होते.[९] हा ठराव लक्षात घेण्यासारखा आहे. त्यात म्हटले होते, ''अलीकडे जीवन-व्यवहार व्यापक होत असल्याने नवीन-नवीन शब्दांची नड वाटत आहे, म्हणून चटकन समजू शकतील आणि व्यवहारात सहज उपयोगात आणता येतील असे सोपे, साधे व अर्थवाही शब्द शक्यतो मराठी वळणाचे बनवावेत आणि अनावश्यक असे संस्कृत किंवा इतर भाषांतील दुर्बोध शब्द बळेबळे घालू नयेत. असे या संमेलनाचे मत आहे. या ठरावाला डॉ. माधवराव पटवर्धन तथा कवी माधव ज्युलियन यांनी अनुमोदन दिले होते.[१०] समाजाच्या विविध गरजा भागवण्यासाठी भाषा अशी लवचिक व प्रवाही ठेवावयाची याचा विचार त्या काळातील वृत्तपत्रांना कसा पडला होता आणि त्यामुळे मराठी साहित्य संमेलनासारख्या मध्यवर्ती संस्थेला त्याचा विचार करणे कसे भाग पडले हे यावरून दिसून येते.

गेल्या ५० वर्षात परिस्थिती खूपच पालटली आहे. वृत्तपत्रीय किंवा स्तंभलेखनाच्या भाषेतही क्रांती झालेली आहे. भाषा अधिक प्रवाही, सोपी आणि लोकजीवनाशी, लोकव्यवहाराशी जवळीक साधणारी आहे. काही स्तंभलेखकाची भाषा सुडौल, धारदार, कमावलेली असते. तर काही लेखकांची भाषा प्रासादिक, मनोहारी, ललितपूर्ण व नादमधुर असते.

वित्त, विज्ञान, उद्योग, व्यापार, कृषि, सहकार, कायदा, शिक्षण, क्रीडा, राजकारण, चित्रपट, वाङ्मय अशा नानाविध क्षेत्रातील माहिती घटना आपली मते साध्या सोप्या भाषेत वाचकांसमोर मांडण्याची अवघड कामगिरी स्तंभलेखकांना पार पाडावी लागते. स्तंभलेखनात फार लांबलचक लिहून चालत नाही, तसेच ते अगदी त्रोटक, जुजबी किंवा केवळ सोपे लिहूनही भागत नाही. ते टोकदार आणि गोळीबंदही असावी लागते. आणि घाईघाईने वाचणाऱ्या वाचकाला वाचनास भाग पाडण्याइतके आकर्षकही असावे लागते. वृत्तपत्राचा वाचक हा विविध स्तरातील सर्वसामान्य नागरिक असतो. त्याला प्रत्येक क्षेत्राचे ज्ञान असेलच असे नाही. शिवाय वृत्तपत्रातील

लेखनाचे वाचनही कोणी अभ्यासाचे पुस्तक वाचावे तेवढ्या नेटाने व एकाग्रतेने करत नाही. त्यामुळे घाईघाईने वाचन करणारा सर्वसामान्य वाचक डोळ्यासमोर ठेवून स्तंभलेखकाला लिहावे लागते.

कोणत्याही वृत्तपत्रीय लेखनात म्हणूनच भाषेला अनन्य साधारण महत्त्व आहे. भाषा हा वृत्तपत्रीय लेखनाचा केवळ देहरूपच नसून प्राणही आहे. शब्द हेच वृत्तपत्रीय लेखकांच्या हातातील एकमेव महत्त्वाचे शस्त्र आहे. तेच त्यांचे साधन असते.

## स्तंभलेखनाकरिता आवश्यक वृत्तपत्रीय लेखन वैशिष्ट्ये

वृत्तपत्रे आणि साहित्य ही दोन्हीही संवादाची माध्यमे आहेत. भाषा हे त्याचे वाहक आहे. साहित्य आणि पत्रकारिता यांमध्ये अंतर असले तरी त्यातील सीमारेषा फारच पुसट व तरल आहेत. साहित्य असो वा वृत्तपत्र दोन्ही ठिकाणी लेखन पद्धती आणि भाषा महत्त्वाची असते.

माहिती, मतप्रदर्शन, सेवा आणि मनोरंजन हे वृत्तपत्राचे कार्य तर अनुभूतीचा विचार जीवनविषयक दृष्टिकोनाचा विस्तार हे साहित्याचे काम. साधे सोपे सर्वसाधारण साक्षरांना कळेल असे लेखन ही वृत्तपत्राची मागणी तर कलात्मक अनुभूतीचा प्रत्यय देणारे लेखन ही साहित्याची अट आहे. दोन्हीही एकमेकांना पूरक तरीही भिन्न. त्या दृष्टीने वृत्तपत्रीय भाषा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. तरीही वृत्तपत्रातील काही लेखन चिरंतन स्वरूपाचे ठरून त्याला साहित्याचे मूल्य आपोआप प्राप्त होते.

स्तंभलेखनाच्या लोकप्रियतेचे कारण म्हणजे लेखकाची लेखनशैली आणि अशा प्रकारच्या लेखनात दिसणारा व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोन, समूहाचे मानसशास्त्र जाणून लिहिणाराचे स्तंभ अधिक वाचले जातात. स्तंभलेखक आपली स्वत:ची मते, आपल्या भावना किंवा विचार वाचकांना अत्यंत विश्वासात घेऊन मांडतो. त्यांच्याशी जणू तो गुजगोष्टी करतो. टीका-टिप्पणी करतो. अशा लेखनातून प्रत्येक लेखकाची स्वतंत्र शैली निर्माण होते आणि ती शैली त्या स्तंभाची किंवा स्तंभलेखकाची ओळख बनते.

स्तंभलेखन हा वृत्तपत्रीय लेखनाच प्रकार लोकप्रिय होण्यामागे त्याचे हे वैशिष्ट्य महत्त्वाचे ठरते. वृत्तपत्रीय लेखनामधील बातमी, लेख, निबंध यांपेक्षा ही शैली वेगळी आहे. स्तंभलेखन, वृत्तलेख, सदर, अग्रलेख यासारख्या सर्व वृत्तपत्रीय लेखनासाठी वृत्तपत्रीय लेखनवैशिष्ट्ये महत्त्वाची ठरतात. शब्दयोजना, वाक्यरचना हे वृत्तपत्रीय लेखनाचे घटक आहेत. इंग्रजीत प्रत्येक वृत्तपत्राचे स्वतंत्र शैलीपुस्तक (स्टाइल बुक) असते. आपल्याकडे मराठीमध्ये नसले तरी प्रत्येक वृत्तपत्राची

लेखनशैली, भाषाशैली, वाक्यरचना पद्धत भिन्न-भिन्न दिसून येते. लेखकाच्या आत्माविष्कारास वाव देणारा हा वृत्तपत्रीय लेखनाचा प्रकार त्यामुळेच स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करू शकला आहे आणि प्रत्येक स्तंभलेखकाच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे आणि त्यातील साहित्य गुणांमुळे स्तंभलेखनाने स्वत:चे वाचक निर्माण केले आहेत.

## वृत्तपत्रीय स्तंभलेखनाची पथ्ये

वृत्तपत्रीय लेखन करताना विशेषत: आवश्यक आहे. असे काही दोष पुढीलप्रमाणे -

१. **व्याकरण दृष्टता** - वाक्यरचना करताना नेहमी किंवा शक्यतो रूढ पद्धतीचा अवलंब करावा. कर्ता, कर्म, क्रियापद यांचा क्रम सुसंगत असावा.

२. **दुर्बोधता** - सोपेपणा हा वृत्तपत्रीय लेखनाचा विशेष आहे. त्यामुळे स्तंभलेखनातही संदिग्धता किंवा संमिश्रता नसावी.

३. **भरतीचे शब्द** - वृत्तपत्राच्या मर्यादित जागेत लेखन करावे लागते. त्यामुळे थोडक्या शब्दात जास्तीत-जास्त आशय आणावा लागतो. स्तंभलेखनामध्ये संक्षिप्तता हा गुण असतो. ज्यादा शब्द, भरतीचे शब्द यांचा वापर टाळावा. ('ब्रिव्हिटी इज द सोल ऑफ न्यूज पेपर रायटिंग' असे म्हणतात.)

४. **फसवी शब्दरचना** - शब्दांचा नेमका अर्थ लक्षात न घेता वेगळ्याच अर्थाने त्याचा वापर करण्याचा प्रकार वृत्तपत्रीय स्तंभलेखन करणाऱ्याने टाळला पाहिजे. काही वेळा असा वापर अलंकारिकता म्हणून क्षम्य ठरतो. परंतु सर्वसाधारणपणे साध्या, सोप्या व सरळ अर्थाने शब्दांचा वापर करावा.

५. **अनावश्यक शब्द** - जेव्हा लेखक भाषेच्या आहारी जाऊन गरजेपेक्षा अधिक शब्द वापरतो. तेव्हा हा दोष उत्पन्न होतो. ही शब्दांची उधळपट्टी टाळली पाहिजे.

६. **जुनाट शब्दप्रयोग (क्लिशे)** - व्याकरणदृष्ट्या बरोबर असणारी परंतु भाषेत वारंवार वापरून निष्प्रभ, कालहीन झालेले किंवा जुनाट दुर्बोध शब्द वापरण्याचे टाळावे.

७. **आडवळणी लेखन** - सरळ न सांगता आडवळणाने सांगणे किंवा एखादी गोष्ट चांगली असून काही वेळा भलताच अर्थ निघून अनर्थ होण्याची शक्यता असते. उपरोधिक किंवा उपहासात्मक विनोदी लेखन सर्वांना जमेल असे नाही. त्यामुळे बऱ्याचवेळा आडवळणी लेखन टाळून स्पष्टपणे लिहिणे आवश्यक असते.

## स्तंभलेखनाची व्याप्ती

स्तंभलेखन हा व्यापक प्रमाणात लिहिला जाणारा वृत्तपत्रीय लेखन प्रकार असल्याने मराठी वृत्तपत्रातील स्तंभलेखनाच्या व्याप्तीचा मागोवा इथे घेतला जाणार आहे.

### १) मराठी वृत्तपत्रातील स्तंभलेखनाचा प्रारंभ

मराठी वृत्तपत्रसृष्टीत स्तंभलेखन हा खूप जुना, परंपरेने चालत आलेला वृत्तपत्रीय लेखनाचा प्रकार आहे. मराठी वृत्तपत्रसृष्टीत स्तंभलेखनाची परंपरा उण्यापुऱ्या दीडशे वर्षांपासूनची आहे. आज स्तंभलेखनाचे स्वरूप काही समकालीन घटना आणि प्रश्नांवरचे लेखन असे झाले आहे. परंतु १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात समाज प्रबोधनाचा, सामाजिक जागृतीचा धागा फार बळकट होता असे लक्षात येते.

याचा मागोवा घेत मागे जायचे तर 'प्रभाकर' या पत्रापर्यंत जाता येईल. मराठी वृत्तसृष्टीचे प्रवर्तक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्यानंतर प्रभाकर हे साप्ताहिक १८४१ साली सुरू झाले. साप्ताहिक 'प्रभाकर' च्या अंकात गोपाळ हरी देशमुख उर्फ 'लोकहितवादी' यांची 'शतपत्रे' १८४८ पासून प्रसिद्ध झाली. ही मराठी वृत्तपत्रसृष्टीतील स्तंभलेखनाची सुरूवातच म्हणायला हवी. समाजाचे प्रबोधन करणे, समाजाला जागृत करणे या कर्तव्यबुद्धीतून हे लेखन लोकहितवादी यांनी केले. समाज सुधारणेचा विचार मांडणाऱ्या या स्तंभाने महाराष्ट्रात काय आणि कोणती क्रांती घडविली हे सर्वांना ज्ञात आहे.

त्याही आधी 'दर्पण' मध्ये काही सदरे होती पण त्याला 'स्तंभलेखन' म्हणता येण अवघड आहे. 'प्रभाकर'नंतर 'केसरी', 'सुधारक' ही वृत्तपत्रे येतात. त्यापूर्वी 'ज्ञानप्रकाश' आणि 'संदेश' या वृत्तपत्रांनी स्तंभलेखनाला स्थायी स्वरूप दिल्याचे दिसते. 'संदेश' मध्ये 'वत्सला वहिनीची पत्रे' हे स्तंभलेखन 'संदेशकार' अच्युतराव कोल्हटकर तर कधीकधी न्यायमूर्ती तुळजापूरकर लिहित असत. या लेखनात सामाजिक आणि राजकीय विषयावरील चिकित्सक विचार व भाष्य प्रकट होई. हरिभाऊ आपटे यांच्या 'करमणूक' पत्रातील 'सगुणाबाईची मुलीस पत्रे' किंवा 'गोविंदरावांची मुलास पत्रे' हे स्तंभ गाजले होते. तर 'ज्ञानप्रकाश'मध्ये नाटक, चित्रपट, संगीत, क्रीडा, शेती अशा विषयावरील स्तंभलेखन प्रसिद्ध होत असे.[११]

## २) स्वातंत्र्योत्तर स्तंभलेखन

स्वातंत्र्यानंतर दैनिकाची पत्रकारिता सुरू झाल्यावर सर्वप्रथम 'लोकसत्ता'कार ह. रा. महाजनी यांनी स्तंभलेखन लोकप्रिय केले. त्यांनी स्वत: स्तंभलेखन तर केलेच परंतु नवनवे स्तंभलेखन आणि सदरे सुरू केली.

केसरीतही लघुनिबंध, खेळ, खेळाडू, शेतकरी इत्यादी सदरे आणि त्यातून स्तंभलेखन येऊ लागले होते. हळूहळू त्याचे अनुकरण इतर वृत्तपत्रांतूनही होऊ लागले. लोकसत्तातील ह. रा. महाजनी यांचा वारसा पुढे विद्याधर गोखले, माधव गडकरी, डॉ. अरुण टिकेकर यांनी सांभाळला. दैनिक वृत्तपत्रे व रविवार पुरवणी, आकर्षक करण्याकरता सजविण्याकरिता संपादकाला अनेक क्लृप्त्या लढवाव्या लागतात. त्यापैकी त्यावेळी सदर आणि स्तंभलेखन ही एक आवश्यक गोष्ट ठरली. रोज वेगवेगळे, विशिष्ट विषयांना वाहिलेले आणि तज्ञ लेखक व विद्वानांनी लिहिलेले स्तंभलेखन दै. सकाळ आणि दै. लोकसत्ता यांनी रूढ केले आहे. साहित्य, संस्कृती, शिक्षण, अध्यात्म, अर्थकारण, शेती, विज्ञान-तंत्रज्ञान, रंगभूमी, संगीत, उद्योग-व्यापार अशा अनेक विषयावरील स्तंभलेखन रोजच्या रोज प्रसिद्ध करण्याचा पायंडा या दोन वृत्तपत्रांनी घालून दिला.

इतर वृत्तपत्रांनीही याची सुरूवात केली. त्यामध्ये 'लंडनची बातमीपत्रे' (द. वि. ताम्हणकर), 'राजधानीतून' (गंगाधर इंदुरकर) इत्यादी वार्तापत्राचे स्तंभही विशेष लोकप्रिय झाल्याचे दिसते. फेरफटका, कालप्रवाह, पहिला चहा इत्यादी सदरातून येणारे स्तंभळलेखनही वाचनीय ठरले आहे.

व्यासंगी समीक्षक व जेष्ठ पत्रकार प्रभाकर पाध्ये यांचे 'आभाळातील अभ्र', विनोदी लेखक बाळ गाडगीळ यांचे 'सकाळचे ऊन', ज्येष्ठ समीक्षक प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांचे 'पाक्षिकी', भटक्या समाजातील लेखक कार्यकर्ता लक्ष्मण माने यांचे 'बंद दरवाजा' आणि स्त्रीवादी चळवळीच्या अभ्यासक नेत्या छाया दातार यांचे 'स्त्री पुरुष' हे सारेच स्तंभ वेगळे व वाचनीय ठरले. अशोक जैन यांचे 'कानोकानी' आणि मधुकर भावे यांचे लोकमतमधील 'उत्तर-दक्षिण' हे स्तंभ वाचकप्रिय ठरले. सामना, लोकमत, पुढारी, तरुण भारत ही व अन्य दैनिकेही रोजच्या रोज अनेक स्तंभ प्रकाशित करतात.

'सामना'तील शेषराव मोरे, नामदेव ढसाळ यांच्या स्तंभलेखनातून त्यांचा अभ्यास, त्यांची भूमिका आणि दृष्टी स्पष्ट होताना दिसते. या दोघांनीही साहित्याबद्दलचे विचार त्यांच्या स्तंभातून मांडताना तथाकथित विचारवंत, समीक्षक, कवी-लेखक यांच्यावर अभ्यासपूर्ण पडझड, टीका

केली आहे. भाषेतील सरळपणा, परखडपणा आणि स्पष्ट मते यामुळे त्यांचे स्तंभलेखन आवर्जुन वाचले जात असे.

श्री. के. क्षीरसागर, अ. ना. देशपांडे, द. ग. गोडसे, रवींद्र पिंगे, गंगाधर गाडगीळ, बाळ सामंत, जयवंत दळवी, वि. ग. कानिटकर, राम शेवाळकर, सुरेश भट, श्री. ज. जोशी, स. शि. भावे, गोविंद तळवळकर, शरणकुमार लिंबाळे, उत्तम कांबळे, दादा मल्हारी मोरे, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, रामनाथ चव्हाण, राजन गवस, अरुण साधू, अनिल अवचट, कुमार सप्तर्षी, नरेंद्र दाभोळकर, भाऊ पाध्ये, दिलीप चित्रे, चंद्रकांत पाटील, स. रा. गाडगीळ, निर्मलकुमार फडकुले अशी नामवंत आणि यशस्वी स्तंभलेखकांची खूप मोठी यादी होईल. ज्यांनी विविध विषयावर सातत्यपूर्ण स्तंभलेखन केले आणि नंतर त्यांच्या स्तंभलेखनाचे ग्रंथरूपातही तितकेच स्वागत झाले.

याशिवाय व्यंकटेश माडगुळकर (सखा, पांढऱ्यावर काळे), विजया राजाध्यक्ष (नित्य नवा दीस जागृतीचा, तळ्यात मळ्यात, अवती भवती), म. वि. राज्याध्यक्ष (भाषाविवेक), ह. मो. मराठे (दिनमान, एक माणूस .... एक दिवस, सकाळचा चहा), सुभाष भेंडे (साहित्य संस्कृती), द. मा. मिरासदार (गप्पांगण), मुकुंद टाकसाळे (चावटी, मिस्किलरी, कागदीबाण, सरमिसळ, गमती गमतीत) दिलीप प्रभाळकर (फसवा फसवी, गुगली), इंदिरा संत (मालन गाथा), अरुणा ढेरे (साहित्य संस्कृती), सुधीर मोघे (निरंकुशाची रोजनिशी) इत्यादी स्तंभलेखने गाजली होती.

## ३) स्तंभलेखन पुरवणाऱ्या संस्था - सिंडिकेटस्

स्तंभलेखन पुरविणाऱ्या काही संस्थाही असतात. त्यांना सिंडिकेट म्हणतात. अशा संस्थांमार्फत एकच स्तंभ किंवा लेख अनेक वृत्तपत्रांना दिला जातो. खुशवंत सिंग, कुलदीप नय्यर किंवा सुनील गावसकर यांचे क्रिकेट दौऱ्यांच्या दरम्यान प्रसिद्ध होणारे स्तंभलेखन अशी काही स्तंभलेखने या माध्यमातून प्रसिद्ध होत असतात आणि ती वाचकप्रियही झाली आहेत. काही वेळेला मूळ इंग्रजी लेख इतर प्रादेशिक भाषेत भाषांतरीत करून छापला जातो.

क्रीडाविषयक होणारे स्तंभलेखन विशेष लोकप्रिय आहे. एवढेच नव्हे तर हे स्तंभ मोठमोठ्या नामवंत खेळांडूकडून चालविले जातात. (उदा. सुनील गावसकर लिहितो) असे स्तंभ नियमित देणाऱ्या काही संस्था (सिंडीकेटस्) आहेत. काही वेळा हे स्त्री काही जाहिरात संस्था (स्पॉन्सरर्स) चालवितात.

## ४) काही गाजलेली स्तंभलेखन

व्यावसायिक लेखन किंवा वृत्तपत्रीय लेखन आणि सर्जनशील लेखन हातात हात घालून एकत्रित जाऊ शकतात. हे आपल्या स्तंभलेखनातून ज्यांनी दाखवून दिले. अशा काही नामवंत स्तंभलेखनामध्ये शांता शेळके, विजय तेंडुलकर, माधव गडकरी यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल.

विजय तेंडुलकरही मराठा दैनिकात संपादकीय खात्यात उपसंपादक म्हणून काम करीत होते. या अनुभवाचा फायदा त्यांना लेखनामध्ये फार झाला. त्यानंतरही त्यांनी अनेक वृत्तपत्रांतून स्तंभलेखन केले आहे. कोवळी उन्हे (महाराष्ट्र टाईम्स), रातराणी (साप्ताहिक माणूस) ही त्यांची स्तंभलेखने गाजली आणि त्याची पुस्तकेही झाली.

शांता शेळके या फक्त कवयित्री नाहीत तर त्यांनी पत्रकारितेचे धडे आचार्य अत्रे यांच्या हाताखाली गिरवले आहेत. शांता शेळके यांची पाण्यावरच्या रेघा (केसरी), जाणता अजाणता (महाराष्ट्र टाईम्स), एकपानी (ललित) स्तंभलेखने वाचकांना खूपच आवडली आणि या स्तंभलेखनाची पुस्तकेही लोकप्रिय झाली. त्यांनी स्तंभांना पुस्तकरूप देताना 'पाण्यावरच्या रेघा' ऐवजी 'पाण्यावरची अक्षरे' असा बदल नंतर केला.

'चौफेर' या आपल्या लोकप्रिय सदरामुळे गाजलेले ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक माधव गडकरी यांनी अनेक विषय आपल्या स्तंभातून मांडले आणि समाजाशी आपले नाते दृढ केले. चौफेर या स्तंभलेखनाच्या आठवणी सांगताना ते म्हणतात, "दि. १९ नोव्हेंबर १९७६ रोजी मुंबई सकाळमध्ये सुरू झालेले 'चौफेर' सदर लोकसत्तेत सुरू राहिले. निवृत्तीनंतरही पाच वर्षे ते चालू राहिले आणि अखेर २८ फेब्रुवारी १९९७ रोजी या 'सदरा'शी मी आपणहून निरोप घेतला. एकूण ३० वर्षे तीन महिने या सदराचे लेखन चालू होते."[१२]

'चौफेर' आपण का आणि कशासाठी लिहित होतो याबाबत आपल्या मनोगतात त्यांनी म्हटले आहे, "चौफेर सदराची जातकुळीच वेगळी होती. दैनंदिन घटनामधील केवळ प्रतिक्रिया असे त्याचे स्वरूप नव्हते. काहीतरी चांगले घडावे, चुकलेले दुरुस्त व्हावे आणि झाकलेले खुले व्हावे. अशा विविध उद्दिष्टांसाठी हे लेखन चालले. आशावाद तर जपलाय, परंतु पुरोगामी विचारांबाबत कुठेही तडजोड केली नाही."[१३]

गडकरी यांच्या स्तंभाला खूप लोकप्रियता मिळाली. समाजाच्या सर्व थरातून त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक प्रश्न त्यांनी आग्रहाने मांडले. वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजाशी संवादाची त्यांनी जणू विधायक भूमिकाच मांडली. त्यांची थेट शैली, प्रवाहीपणे मांडलेले तपशील आणि परखड टीका-टिप्पणी यामुळे चौफेरची चर्चा दीर्घकाळ सुरू राहिली.

स्तंभलेखनामध्ये काही विक्रमी लेखनसुद्धा झाले आहे. सातारच्या ऐक्य साप्ताहिकाचे १९ जानेवारी १९६७ साली दैनिकात रूपांतर झाले. या दैनिकाच्या पहिल्या दिवसापासून जयवंत गुजर यांनी 'सूर्यफूल' या नावाचे स्तंभलेखन सुरू केले आणि सलग पस्तीस वर्षे दररोज लिहिले. एवढा दीर्घकाळ एकाच नावाचे, एकाच लेखकाने एकाच वृत्तपत्रात अखंडपणे लिहिलेले स्तंभलेखन हा एक जागतिक विक्रम आहे.[१४]

दलित साहित्यिकांनी आपले वेगळे अनुभवविश्व वृत्तपत्रीय स्तंभलेखनातून शब्दबद्ध केले आहे. लक्ष्मण माने, दया पवार, शरणकुमार लिंबाळे, उत्तम कांबळे, दादा मल्हारी मोरे, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, रामनाथ चव्हाण, राजन गवस या स्तंभलेखकांचा या संदर्भात निर्देश करता येईल.

परिवर्तनवादी चळवळीशी निगडित व पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणारे लेखकही वृत्तपत्रीय स्तंभलेखन करताना दिसतात. अशा लेखकांमध्ये अरुण साधू, डॉ. अनिल अवचट, डॉ.कुमार सप्तर्षी, डॉ. नरेंद्र दाभोळकर, भाऊ पाध्ये, दिलीप चित्रे, चंद्रकांत पाटील अशा अनेक पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी स्तंभलेखन केले आहे.

काही स्तंभलेखक राजकीय, सामाजिक विषयावरील भाष्यासाठी किंवा विश्लेषणासाठी ओळखले जातात. काहीवेळा राजकीय, सामाजिक विषयांवर टिप्पणी करणारे तर काही वेळा उपहासात्मक पद्धतीने विसंगतीवर बोट ठेवत. वस्तुस्थिती वाचकांसमोर आणण्याचे काम स्तंभलेखकांनी केले आहे. अशा स्तंभलेखकांत ह. रा. महाजनी, गोविंद तळवलकर, द्वा. भ. कर्णिक, चंद्रकांत घोरपडे, ग. वा. बेहरे, नारायण आठवले, दि. वि. गोखले, माधव गडकरी, डॉ. अरुण टिकेकर, कुमार केतकर असे काही संपादक, सहसंपादक असलेले स्तंभलेखक आहेत. एखादी राजकीय किंवा सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती वा घटना किंवा त्या घटनेमागचे व्यापक संदर्भ समजावून देत ते आपले स्तंभलेखन करतात.

## ५) क्रीडाविषयक स्तंभलेखन

अलिकडच्या काळात क्रीडाविषयक बातम्यांचे महत्त्व वाढले आहे. केवळ वृत्तपत्रच नव्हे तर इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनही खेळाच्या बातम्या अतिशय महत्त्वाच्या ठरत आहेत. विशेषत: क्रिकेट प्रेमाबद्दल नव्याने वेगळे सांगायला नको. क्रिकेट, बुद्धिबळ, टेनिस, हॉकी, मुष्ठीयुद्ध आणि आता नेमबाजी आणि कुस्ती या खेळातील विजेत्यांनी वर्तमानपत्रातून दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांना मोठा ग्राहकवर्ग मिळवून दिला आहे. या खेळातील नामवंत खेळाडूंचे प्रासंगिक स्वरूपाचे स्तंभलेखन आता वृत्तपत्रांचा अविभाज्य भाग बनले आहे.

सुनील गावसकर, रवी शास्त्री, संदीप पाटील, दिलीप वेंगसरकर, कपिल देव यांचा बरोबर अजित वाडेकर, बिशनसिंग बेदी या ज्येष्ठांनीही क्रिकेटवर, क्रिकेट मोसमात स्तंभलेखन केल्याचे दिसते. या प्रकारचे स्तंभलेखन प्रसिद्ध करून संबंधित वृत्तपत्रे क्रीडाविषयक माहिती जाणून घेणारा क्रीडाप्रेमी नवा वाचक मिळवण्याचा प्रयत्न करतात, ज्याचा फायदा त्यांना अधिक लोकप्रियता आणि आर्थिक फायदा घेण्यात होतो. काही स्तंभलेखकांना आणि काही स्तंभांना आता विविध कंपन्या पुरस्कृत करू लागल्या आहेत. या माध्यमातूनही लेखकांना आणि वृत्तपत्रांना आर्थिक प्राप्ती होत असते.

प्रत्यक्ष खेळाडूच लिहित असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व दिले आहे. प्रवीण ठिपसे किंवा रघुनंदन गोखले यांच्यासारखे बुद्धिबळपटू सध्या त्यांच्या खेळाबद्दल नियमितपणे लिहित असतात. ही एक वेगळीच जाणीव स्तंभलेखनाच्या रूपाने निर्माण झाली आहे.

याशिवाय खेळाचे समालोचन करणारे समीक्षकही स्तंभलेखन करतात. व्ही. व्ही. करमरकर, बाळ पंडित, रघुनंदन लेले, पंच माधव गोठस्कर यांच्यासारखे खेळाशी संबंधित असणारेही स्तंभलेखन करतात. याशिवाय प्रत्यक्ष खेळाशी संबंधित नसणारे पण खेळाविषयी पूर्ण माहिती असणारे हर्ष भोगले, द्वारकानाथ संझगिरी यांसारखे स्तंभलेखक क्रीडा विश्वातल्या गंमती-जमती किंवा विसंगतीवर खुसखुशीत शैलीत लिहून विनोदी पद्धतीने सामान्य क्रीडा रसिकांच्या भावनांना मूर्तरूप देतात. वाचकांना हसते करणारे शिरीष कणेकर यांचे 'कणेकरी' किंवा दिलीप प्रभावळकर यांचे 'गुगली' यांसारखी स्तंभलेखने सुद्धा वाचकप्रिय झाली आहेत.

## ६) स्तंभलेखन आणि वृत्तपत्रांचे संपादक

वृत्तपत्रातील लेखनप्रकारात स्तंभलेखन हा एक लोकप्रिय आणि वाढता लेखनप्रकार करण्यामध्ये नामवंत खेळाडू, कलावंत, लेखक, सामाजिक नेते यांना लिहिते करणाऱ्या संपादकांचा फार मोठा वाटा आहे. काही संपादक स्वत:ही लोकप्रिय स्तंभलेखक होते. 'ज्ञानप्रकाश'कार काकासाहेब लिमये आणि 'संदेश'कार अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्यापासून स्तंभलेखनाची दृष्टी असणाऱ्या संपादकांची परंपरा सुरू होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'लोकसत्ता' कार ह. श. महाजनी यांनी स्तंभलेखन लोकप्रिय केले. त्यांनी स्वत: स्तंभलेखन केलेच परंतु नवनवे स्तंभलेखन सुरू करून अनेक लेखकांना संधी दिली. लोकसत्तातील महाजनी यांचा वारसा पुढे संपादक म्हणून काम करणाऱ्या विद्याधर गोखले, माधव गडकरी, डॉ. अरुण टिकेकर यांनी सांभाळला.

'आपल महानगर' या सायंदैनिकाचे संपादक म्हणून काम करणारे निखिल वागळे यांनी अनेक कार्यकर्ते, लेखक आणि कलावंत यांना स्तंभलेखनाकरिता उद्युक्त केले. सायंदैनिकातून संजय पवार, अनंत भावे, अविनाश महातेकर, मनोहर कदम, डॉ. राजेंद्र बर्वे, डॉ. अनंत नाडकर्णी, प्रदीप कर्णिक अशा लेखकांची वेगळी आणि फ्रेश वाटणारी स्तंभलेखने वाचायला मिळत असतात. ज्येष्ठ संशोधक डॉ. य. दि. फडके यांनीही या वर्तमानपत्रातून स्तंभलेखन केले आहे.

सकाळ वृत्तपत्राच्या संपादकांनीही हा वारसा चालवलेला आहे. 'रविवार सकाळ' च्या पुरवणी अंकाचे संपादक म्हणून काम करताना १९८६ ते १९८८ या काळात सदा डुंबरे यांनी स्तंभलेखनाचा एक वेगळाच पैलू दाखवला. एका पत्रकारकाने, संपादकाने लिहिलेल्या या स्तंभमध्ये पत्रकारितेच्या जगाला आलेले नवे भान, नवे भाष्य, नव्या जाणिवा यांचा एकसारखा आवाका फार क्वचित इतरत्र आढळतो. सदा डुंबरे यांचा आवाका वाचकांना चकित करणारा होता. लोकसत्ता, लोकमत, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स यांसारख्या वृत्तपत्रांच्या संपादकांनी स्तंभलेखनाच्या बाबतीत काही वर्षात चांगले वस्तुपाठ उभे केले आहेत. संपादक गोविंद तळवलकर यांनी 'वाचता-वाचता' या स्तंभातून अनेक नव्या ग्रंथांची माहिती वाचकांना करून दिली आहे. ज्येष्ठ संपादक आणि लेखक माधव गडकरी यांचे स्तंभ गाजले. तसेच त्यांनी अनेक नवे स्तंभलेखकही तयार केले आहेत.

स्वत: डॉ. रा. वि. टिकेकर यांचे स्तंभलेखन हे गेली जवळपास १० वर्षे लोकसत्ता दैनिकातून सातत्याने सुरू आहे. 'तारतम्य', 'सारांश' या नावाने ते सुरू आहे किंवा रविवारच्या अंकातील पुरवणीत येणारे 'स्थळ-काळ' हे त्यांचे स्तंभलेखन प्रसिद्ध आहे. याकाळाचे संपादक विजय कुवळेकर

यांनीही बातमीप्रमाणे वृत्तपत्रीय लेखनाच्या अन्य अंगाकडे लक्ष दिले. कुवळेकर हे स्वत: कवी, कथाकार, कादंबरीकार, चित्रपट, पटकथाकार आहेत. मध्यमवर्गीय वाचकांच्या जीवनात साहित्य, कला व संस्कृतीला मोठे स्थान असते. हे लक्षात घेऊन कुवळेकर यांनी काही बदल केले. नव साहित्य, नवी सदरे, नवे स्तंभलेखन त्याचबरोबर नामवंतांचे स्तंभलेखन प्रसिद्ध करण्यास सुरूवात केली. इंदिरा संत आणि ना. ध. देशपांडे या ज्येष्ठ कवींची आत्मकथने कोल्हापूर सकाळने या काळात प्रसिद्ध केली. कुवळेकर यांनी प्रसिद्ध अग्रलेखाचे पान गंभीर आणि भारदस्त केले. एखादा वाचक अग्रलेख वाचतो असे विविध पाहणी अहवाल सांगतात.[१५] त्यांचा अभ्यास करून कुवळेकर यांनी अग्रलेखाच्या पानात बदल केला. या पानात लालित्य आणि वैविध्य आणले. अनेक सदरे, स्तंभ या पानावरून प्रसिद्ध केले. त्यामुळे अग्रलेखाच्या पानाकडे एरव्ही फारसे लक्ष न देणारा वाचकही हे पान आवर्जुन वाचताना आढळू लागला. विजय कुवळेकर यांनी अनेक लेखकांकडून दर्जेदार स्तंभ लिहून घेतले. याच पद्धतीने 'कोल्हापूर सकाळ' नंतर 'पुणे सकाळ' आणि 'लोकमत' या वृत्तपत्रांच्या संपादक पदाची जबाबदारी सांभाळणारे अनंत दिक्षित यांनीही अनेक नामवंत तसेच नवोदित लेखकांना संधी दिल्याने स्तंभलेखन करून घेतले. 'लोकमत'च्या सातारा जिल्हा आवृत्तीचे सहसंपादक म्हणून काम करणारे मुकुंद फडके यांनी एक नवा प्रयोग केला. 'लोकमत सातारा आवृत्ती' रोज प्रसिद्ध होणाऱ्या 'हॅलो सातारा' या पुरवणीमध्ये पहिल्या पानावर 'सलाम नमस्ते' हा स्तंभ सुरू केला. तो आजतागायत सुरू आहे.

'लोकसत्ताचे' व्यासंगिक संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी चोखंदळ दृष्टी ठेवून काही चांगले प्रयोग केले आहेत. त्याचा परिणाम रोजच्या अंकाच्या प्रकृतीवर झाला आणि त्यामुळे अनेक लेखक वृत्तपत्राशी जोडले गेले. 'लोकसत्ताच्या' दैनिक अंकात नियमितपणे मान्यवर लेखकांचे स्तंभलेखन सुरू झाले. तसेच 'लोकसत्ताच्या' शनिवार अंकाबरोबर 'चतुरंग' पुरवणीत आणि रविवार पुरवणीतही असे स्तंभलेखन नियमितपणे प्रसिद्ध होत असते. महिला जगतातील मान्यवरांच्या लेखनाला विशेष आकार दिला. अभिनेत्री अश्विनी भावे, विधिज्ञ सुप्रिया सरवटे, उद्योजिका रजनी दांडेकर, खेळाडू उज्ज्वला पाटील यांचे स्तंभ आलटून पालटून दर शनिवारी प्रसिद्ध होत होते.

स्तंभलेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे सोमवार ते शनिवार रोज एक लेखक एक स्तंभ लिहित असतो. प्रत्येक स्तंभलेखकाचा स्तंभ प्रसिद्ध करण्यात एक वार ठरलेला असतो. आणि अशा सहा लेखकांची टिम आठवडाभर स्तंभ लिहित असते. दर सहा महिन्यांनी लेखकांची टिम बदलून नवी

लेखकांची टिम लिहित असते. या स्तंभातून अनेक राजकिय नेते, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत लेखक, प्राध्यापक, डॉक्टर, शिक्षण तज्ज्ञ चळवळीतील कार्यकर्ते यांनी लेखन केले आहे.

मराठीमध्ये स्तंभलेखन लोकप्रिय करण्यामध्ये लेखकांबरोबरच त्यांच्यावर विश्वास दाखवून आणि लेखकांना पूर्ण स्वातंत्र्य देऊन लिहिते करणाऱ्या संपादकांचा फार मोठा वाटा आहे.

**७) ललित लघुनिबंध व स्तंभलेखन**

स्तंभलेखन हे वृत्तपत्रीय लेखन असले तरी ते गुणधर्माने आणि स्वभावाने ललित गद्याच्या जवळ जाणारे आहे. खरेतर स्तंभलेखन म्हणजे वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणारे ललित गद्यच असते. म्हणूनच स्तंभलेखनाचा विचार करताना ललित वाङ्मयाचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

वाङ्मयप्रकार हा बंदिस्त नसला तरी वाङ्मयाचा अभ्यास करताना वाङ्मयाचे वर्गीकरण व वाङ्मयाची लावलेली अवस्था यामुळे आस्वाद घ्यायला, अभ्यास करायला आधार मिळतो. वाङ्मयाचे समीक्षण करतानाही समीक्षक हीच जाणीव मनामध्ये ठेवून त्या पुस्तकाच्या मूल्यमापनाच्या व विश्लेषणाच्या पायऱ्या चढून जातो. मात्र या व्यवस्थेत वाङ्मयाला बंदिस्त करून ठेवण्याचा प्रकार नसतो. स्थूलमानाने वाङ्मय कथनात्मक, नाट्यात्मक, भावकाव्यात्मक असे तीन मूलभूत भेद करता येतात. स्तंभलेखन हा वरील तिघांपैकी कथनात्मक प्रकारात मोडतो. ललित गद्य हा वाङ्मयप्रकारही कथनात्मक आहे. स्तंभलेखन आणि ललित गद्य कथनात्मक असले तरी कथा कादंबरीपेक्षा वेगळे आहेत. त्याची प्रकृती पूर्णपणे आत्मनिष्ठ अशी असते. ''लघुनिबंधाचा आत्मा मोकळेपणात आहे. एखाद्या विषयासंबंधी लोकांना काय वाटते याचा विचार लघुनिबंध लेखक करीत नाही. उलट त्याविषयी आपल्याला काय वाटते हे तो या जगाला सांगत सुटतो आणि तेही कशा रीतीने ? तर या पृथ्वीवरती प्रत्येक व्यक्ती आपला जिवाभावाचा मित्र आहे... अशा भावनेने.''[१६] हे वि. स. खांडेकर यांचे विधान लघुनिबंधाचे जे वैशिष्ट्य दाखवते तेच वैशिष्ट्ये स्तंभलेखनाला ही लागू पडते.

कथा, कादंबरीतील मी देखील कल्पिताच्या पातळीवरच राहतो. ललित लेखनात असे होत नाही. कथा कादंबरीतील निवेदन आत्मपर असले तरी ते लेखकाचे चरित्र किंवा आत्मचरित्र किंवा लेखकाचा जीवनानुभव जसाच्या तसा असल्याचा समज कधीच करून घेता येत नाही. याचे स्पष्टीकरण गंगाधर गाडगीळ यांनी दिले आहे. ललित लेखनात आशय हा संपूर्णपणे नाट्यरूप धारण करतो. म्हणजेच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वापासून अलग होतो. तो म्हणजे लघुकथा आणि ज्या

ललित जीवनात असे होत नाही ते म्हणजे ललित निबंध असा भेद आपल्याला करता येईल. लघुकथेत निवेदक असतो. आणि ललित निबंधताही असतो. परंतु लघुनिबंधाला निवेदक लेखकाच्या व्यक्तिमत्त्वापासून संपूर्णपणे अलग होत नाही. हे जे मी व्यक्तिमत्त्व म्हटले आहे ते त्या लेखकाचे प्रत्यक्षातले व्यक्तिमत्त्व असेलच असे नाही. ललित निबंध लिहिण्यासाठी त्याने घेतलेली ती भूमिका निबंधाच्या आशयातून विरघळून गेलेली असते. त्या आशयाच्या संदर्भात लेखक स्वत:चे वेगळे व्यक्तिमत्त्व विसरून गेलेला नसतो. त्या आशयाचा एक भाग झालेला असतो.

स्तंभलेखनाच्या आत्मनिष्ठ प्रकृतीमुळेच त्याच्यामध्ये लघुनिबंध, ललितनिबंध, प्रवासवर्णन, आठवणी, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रण असे एकमेकांना जवळ असणारे पण काही प्रमाणात वेगळे पडणारे उपप्रकार दिसत असतात. व्यक्तिचित्रण सोडले तर इतर सर्व उपप्रकारामध्ये 'मी' ठळकपणे दिसून येतो. तर व्यक्तिचित्रणांमधला 'मी' हा अदृश्य स्वरूपात व्यक्त होत असतो.

स्तंभलेखन करणाऱ्या लेखकाची भूमिका ही अशाच स्वरूपाची असते. स्तंभलेखन आणि लघुकथा लेखनात कथात्मक अनुभव हे मूलत: कथनात्मक साहित्य प्रकार असूनही या दोन्हीतील निवेदन आणि निवेदकाची भूमिका यांच्यातील फरकामुळे दोन वाङ्मयप्रकारामध्ये फरक पडतो. लेखकाच्या नकळत स्तंभलेखन त्याच्या लक्ष्मणरेषा ओलांडून कथेच्या प्रांतात प्रवेश करतो आणि या दोन्ही वाङ्मयप्रकारची दोन्ही टोके कमी करते. म्हणजे स्तंभलेखनात येते आणि कथालेखन स्तंभलेखनाचा परिवेश धारण करते. आणि या लेखकाला या कथेतून जे सांगायचे आहे ते व्यक्त होते आणि स्तंभलेखनाचे उद्दिष्ट पूर्ण होते. या दोन्ही लेखनात मी हा मी न राहता आशयात विलीन होतो. तर दुसऱ्यात मी हा मीच राहतो. आशयापेक्षा त्याचे वेगळेपण जाणवत राहते म्हणूनच या दोन्ही वाङ्मय प्रकारांना स्वतंत्र अस्तित्व आहे.

स्तंभलेखन हा प्रकार आपल्याकडे इंग्रजी वाङ्मयामुळे ओळखीचा झाला. स्तंभलेखनावर इंग्रजी लघुनिबंधाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. इंग्रजी लघुनिबंध मराठीमध्ये कसा आला आणि त्याचा प्रभाव कशा प्रकारे पडला याबद्दल वि. स. खांडेकर म्हणतात, ''विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात गार्डीनर (आल्फा ऑफ दी प्लाऊ) सारख्या नवीन पद्धतीने निबंध लिहिणाऱ्या इंग्रजी लेखकाचा झालेला समावेश मराठी लेखन वर्गाला तत्पूर्वी परिचित असलेल्या इंग्रजी निबंधाहून गार्डीनाचे निबंध सर्वस्वी भिन्न होते. नव्या निबंधकाराला कुठलाही विषय चालतो. टोपी ठेवायला एखादी खुंटी लागते त्याप्रमाणे आपले व्यक्तिमत्त्व प्रकट करण्याकरिता निबंधकाराला कुठला तरी विषय

घ्यावा लागतो. इतकेच त्याचे महत्त्व असते. हे गार्डीनर व त्याच्या जोडीचे व तोडीचे ल्यूकात्स, लिंड वगैरे अन्य निबंधकार यांच्यावरून दिसून येते. नव्या निबंधकाराचा बराच प्रभाव मराठीतील निबंध लेखकांवर पडला होता हे लघुनिबंध म्हणजे खरे तर आत्मनिष्ठ निबंधच होते. याच प्रकाराचा ना. सी. फडके यांनी स्तंभलेखनामध्ये उपयोग केलेला आढळतो. ना. सी. फडके यांचेनंतर ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेले सर्व स्तंभलेखन हे गुजगोष्टी म्हणूनच प्रसिद्ध झाले. या गुजगोष्टीमध्ये फडक्यांनी आत्मनिष्ट निबंधाचा वापर कसा केला हे सांगताना वि. स. खांडेकर म्हणतात, ‘‘फडक्यांच्या गुजगोष्टीचा उगम जसा त्यांच्या सौंदर्यनिष्ट वृत्तीत होता. रत्नाकर या तत्कालीन अग्रगण्य मासिकाचे फडके संपादक होते. त्या मासिकातून रसिकांना वाङ्मयाच्या नव्या-नव्या परी सादर करणे त्यांना आवश्यक होते. त्याचवेळी इंग्रजीतला आत्मनिष्ठ प्रकारचा निबंध (पर्सनल एसे) गार्डीन, लिंड, ल्युकात्स, चेस्टर्न वगैरेंच्या वाङ्मयाद्वारे परिचित होऊ लागला होता. हा नवा आत्मपर निबंध आकाराने लहान आणि वाचकांच्या दृष्टीने चटकदार होता. जुन्या निबंधापेक्षा तो स्वभावताच अधिकच रंजक व कथेशी जवळचे नाते असलेला होता.’’[१७]

टीकात्मक आत्मकथनपर किंवा वादविवादात्मकही स्तंभलेखन असू शकते. कधी गंभीर, कधी उत्कंठावर्धक, कधी उपरोधिक नाहीतर भावनात्मक किंवा उपहासात्मक असे स्तंभलेखनाचे स्वरूप ललित निबंधाप्रमाणेच दिसून येते. लघुनिबंध किंवा ललित निबंध हा आकाराने लहान असतो. त्याचप्रमाणे स्तंभलेखनालाही शब्दांचे बंधन असल्याने तेही आकाराने मर्यादित असते. आणि ललित निबंधाप्रमाणे स्तंभलेखनातही हकिकत वजा, वर्णनात्मक किंवा स्पष्टीकरणात्मक लेखन असू शकते. बऱ्याचदा स्तंभलेखनात विषयांतरही झालेले आढळते. लघुनिबंधाप्रमाणे स्तंभलेखनाला कोणताही विषय चालतो. फक्त तो वि. स. खांडेकर यांनी म्हटल्याप्रमाणे वाचकांना गुंतवून ठेवणारा असावा लागतो. आणि वाचक सहजपणे त्या वाचनाच्या प्रवाहात वाहत गेला पाहिजे. अशा प्रकारच्या निबंधाची वैशिष्ट्ये व्हर्जिनिया वुल्फ यांनी सांगितले आहे. ‘‘निबंधाने पहिल्या शब्दापासून शब्द वाचला की त्याला प्रसन्न, टवटवीत करायला हवे. दरम्यान निबंध वाचताना त्याला मनोरंजन, आश्चर्य, उत्कंठा, क्रोध इत्यादींचा अनुभव वेगवेगळ्या परींचा अनुभव आला पाहिजे. कधी कल्पनेच्या उंच भरारीवर तो आरूढ झाला पाहिजे. तर कधी विद्वत्तेच्या तर कधी बौद्धिकतेच्या गहिऱ्या खोल तळाशी तो बुडला पाहिजे.’’[१८]

फडक्यांच्या 'रत्नाकर'मध्ये प्रसिद्ध झालेल्या स्तंभलेखनामध्ये आत्मनिष्ठ वृत्ती व छोटा आकार या वैशिष्ट्यांबरोबर चटकदारपणा आणि विषयांची विविधता आढळते. मराठीमध्ये स्तंभलेखन आणि त्याच्याबरोबर लघुनिबंध यांची वाटचाल पाहिली असता हे लक्षात येते की, जवळपास १९८० पर्यंत ना. सी. फडके यांचे या प्रकारातले लेखन म्हणजे परवलीचा शब्द होते. काही काळ 'केसरी', 'मराठा'मध्ये पत्रकार म्हणून त्यांनी कामही केले होते. जसे बोलणे तशीच त्यांची भाषा लेखनात वापरली आहे. ना. सी. फडके जसे साहित्यिक होते तसेच पत्रकार म्हणूनही कार्यरत होते. मासिक 'रत्नाकर' आणि साप्ताहिक 'झंकार' चे संपादनही त्यांनी केले होते. १९४० सालच्या रत्नागिरी येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना फडके यांनी वृत्तपत्रीय लेखन आणि स्तंभलेखन या विषयावर आपले चिंतन व्यक्त केले आहे. ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यापेक्षा वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यामधून प्रसिद्ध होणारे साहित्य अधिक महत्त्वाचे आहे, असा वेगळा मुद्दा त्यांनी मांडला होता. या मुद्याचे स्पष्टीकरण करताना ते म्हणाले होते, ''समाजाचे रोजचे व्यवहार व लोकांची विचारसरणी अभिरूची यावर सर्वात अधिक परिणाम जर कोणत्या वाङ्मयाचा होत असेल तर वृत्तपत्रीय साहित्याचा होता. हे साहित्य टिकाऊ नसेल, नैमित्तिक असेल परंतु समाजाच्या जीवनावर त्याचे फार दूरवर परिणाम होतात व त्या त्या घटनेविषयी समाजाची अभिरूची त्यातच अधिक अंशाने प्रतिबिंबित होत असते. या दृष्टीने वृत्तपत्रीय साहित्यांना मोठे महत्त्व आहे.''[२०] साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून वृत्तपत्रीय साहित्याची चर्चा संमेलनाध्यक्षांच्या भाषणातून होणे म्हणजे वृत्तपत्रीय स्तंभलेखनाच्या वाङ्मयीन दर्जाची दखल घेतली जाणे होय. लघुनिबंधाच्या इतिहासात स्वतःच्या मनमोकळ्या शैलीने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे लेखक अनंत काणेकर यांनी स्तंभलेखनातून खूप मोठे लेखन केले आहे. 'संजीवना'चे संपादक प्रभाकरपंत कोल्हटकर यांच्या आग्रहावरून त्यांनी 'पिकले पान' हा स्तंभ लिहिला. त्याचे ग्रंथरूप म्हणजे वि. स. खांडेकर यांनी संपादित केलेला 'नवे किरण' हा लघुनिबंध संग्रह. आपण या स्तंभलेखनाच्या क्षेत्रात प्रवेश कसा केला आणि आपण लघुनिबंध लेखक कसे झालो हे सांगताना काणेकर म्हणतात, ''संजीवनीचे प्रभाकरपंत कोल्हटकर माझ्याकडून 'पिकली पाने' लिहून घेईपर्यंत मी कधी काळी लघुनिबंध लिहू शकेल, अशी माझी कल्पनाही नव्हती.''[२१]

नंतरच्या काळात फडक्यांच्या अनुकरणाने कृतक लघुनिबंध लिहिला जाऊ लागला. त्याला एक नटवेपणा आला. पण निबंधाच्या या पडझडीच्या काळात लघुनिबंध श्रावणारे अनंत काणेकर, ना. मा. पंत, कुसुमावती देशपांडे, गो. रा. दोडके हे लेखक होते. या सुमारास १९५० ते ७५ या

काळात मराठी ललितगद्याची परंपरा वाढल्याचे दिसून येते. या काळात मासिके वर्तमानपत्राची रविवार आवृत्ती यात अधिकाधिक ललितगद्य छापले जाऊ लागले. स्तंभ लेखनातून अशा निबंधाचे पुन:र्विलोकन केले गेले. त्यातूनच इरावती कर्वे (परिपूर्ती १९४९), दुर्गा भागवत (भावमुद्रा १९६०, पैस १९७०), ग्रेस चर्चबेल (१९७४), विजय तेंडुलकर (कोवळी उन्हे १९७१) अशी अनेक लेखकांची ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेली स्तंभलेखने आणि त्यातील ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेले लघुनिबंध सांगता येतील.

काणेकर यांनी संपादकाच्या आग्रहावरून त्यांनी स्तंभलेखन लिहायला सुरूवात केली. त्याच्या मनात जे सळसळ होते. त्यांच्या हृदयात जे वारंवार उचंबळून येत होते. त्यांच्या आत्म्याला जे पुन्हा पुन्हा शल्यासारखे बोचत होते. त्याचा अविष्कार त्यांनी या नव्या लेखन प्रकारातून करायला सुरूवात केली. त्यांनी त्या काळातल्या कोणत्याही लघुनिबंध लेखकाचे अनुकरण केले नाही. त्यामुळे त्यांच्या लेखनाला ताजेपणाची विलक्षणाची लज्जत आली. त्यातून लेखकाच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा स्वच्छंद आविष्कार झाला. काणेकरांच्या स्तंभलेखनातील या लघुनिबंधाच्या यशाचे रहस्य उलगडून सांगताना 'नवे किरण' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत वि. स. खांडेकर म्हणतात, "जे रसिक फडक्यांच्या गुजगोष्टी मोठ्या गोडीने वाचीत होते. त्यांना सुद्धा काणेकरांच्या आंबट गोड लघुनिबंधाची खुमारी काही न्यारी आहे, हे आनंदाने मान्य करावे लागेल. फडक्यांची गुजगोष्टी ही शृंगारलेल्या मंदिरासारखी होते. त्या शृंगाराची नक्कल करण्याचा प्रयत्न काणेकरांनी केला असता तर त्यांचे कोणीच कौतुक केले नसते पण त्यांनी स्वत:च्या विचारांचा आणि भावनांचा आविष्कार अत्यंत प्रामाणिकपणे केला. त्या आविष्कारातील त्यांनी जी शैली वापरली ती सुद्धा आपल्या विषयांना अनुरूप आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत अशी ! त्यामुळे त्यांचा उत्कृष्ट लघुनिबंध वाचताना समोर चित्र उभे राहते ते एखाद्या उत्तुंग पर्वत शिखराचे ! गगनाला स्पर्श करण्याची महत्त्वकांक्षा हेच त्या शिखराचे वैभव असते. ओबड धोबड खडकांशिवाय तिथे दुसरे गालिचे नसणे तरी राजमंदिरात रापलेलासुद्धा न आढळणाऱ्या शुद्ध मोकळ्या हवेत माणसाला उल्हासित करण्याची जी शक्ती असते तिचे दर्शन काणेकरांच्या लघुनिबंधात वाचकांना होते."

स्तंभलेखन हे वृत्तपत्रीय लेखन असल्यामुळे अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचत असते. हे लेखन धावपळीत किंवा तातडीचे असल्यामुळे घाईगडबडीत केले जाण्याची शक्यता असते. त्यामुळेच येथे अचूकपणाला महत्त्व आहे. आवडीने लेखन करण्यासाठी इथे फारसा अवसर नसतो. वृत्तपत्रात

लिहिण्यात येणाऱ्या स्तंभाचे प्रयोजन व त्याची तात्कालिकता यातून त्याची शैली घडत असते. तसेच स्तंभलेखन हा मर्यादित शब्दसंख्येचा लेखनप्रकार असल्यामुळे कमी शब्दात आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची सवय लेखकाला लागते. लिखाणाची शिस्त लागते. याबाबत आपला अनुभव सांगताना शांता शेळके यांनी 'एक पानी' या स्तंभलेखनाच्या एकत्रित तयार केलेल्या याच प्रस्तावनेत म्हटले आहे, "या लेखांनी मला आणखी एक शिस्त लावली. एक पानी हे सदर अगदी काटेकोरपणे ललितच्या एकाच पानात बसवायचे असे त्यामुळे लेखांचे स्वरूप निश्चित झाले. घोळ घालून विषयांतरे करत पाल्हाळाने लिहायला अवसर राहिला नाही. पुनरूक्ती टाळली गेली आणि एखादा लहानसा विचार एखादे अनुप्रायस्फुरण, छोटीशी वाङ्मयीन प्रतिक्रिया मोजक्या शब्दात आटोपशीर मांडण्याचे लेखणीला आपोआपच वळत लागते."[२१]

स्तंभलेखनाचा परिणाम लेखकाच्या शैलीवरही होत असतो. एवढेच नव्हे तर लेखकाची शैली निर्माण होण्यास त्यामुळे मदतच होते. हेच शांता शेळके आणि विजय तेंडुलकरांनी आपल्या मुलाखतीमध्ये म्हटले आहे, "मी (स्तंभलेख) लिहित सुटलो आणि काही काळ प्रयास झाले. मनावर ताणही होता. नुसतंच विषयांच नाविन्य आणून उपयोगाचं नव्हतं. शैलीच नाविन्यही मला आणावं लागलं. रोजच्या ललित स्फुटाचा आरंभ, त्याचा शेवट याचा विचार रोज नव्याने करावा लागला. भाषा लवचिक ठेवावी लागली. थोडक्यात, त्याच प्रेक्षकांमुळे रोज नवे सोंग वठवणारा नट असतो. तसा मी झालो. रोज स्वत:हून काही काढून त्यावर लिहिण हा सवयीचा प्रकार इथं उपयोगाचा नव्हता. रोज नवनवीन गोष्टी बघणं मी सुरू केलं त्यासाठी भटकू लागलो. एवढ्याच एका विचारात राहू लागलो. आशयात नाविन्याचा अभाव असे तेव्हा क्लृप्त्या वापरू लागलो. वाचकाला झुलवित ठेवणं महत्त्वाच होतं. त्यातून सुटका नाही. रोज उठून अशा प्रकारे वेगवेगळी सोंग घेताना मी मला माहितही नव्हतो. तसं मला दिसतो. कोवळी उन्हे हे सदर लोकप्रिय झालं. पण या सदरामुळे (कोवळी उन्हे) मी माझ्यातून बाहेर पडलो. लेखक म्हणून आणि माणूस म्हणून माझं क्षितिज रूंदावण्याला या सदराने मदत झाली."[२२]

विजय तेंडुलकर यांनीसुद्धा स्तंभलेखनातून खूप ललितलेखन केले आहे. विजय तेंडुलकर यांचा मूळ पिंड साहित्यिकांचा परंतु चरितार्थासाठी त्यांनी वृत्तपत्र व्यवसाय स्वीकारला. पण या धकाधकीच्या व्यवसायातही त्यांनी स्वत:च्या लेखणीचा ललित गुण कधीचं हरवू दिला नाही. तेंडुलकरांनी वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या दैनिकांतून, साप्ताहिकांतून आणि मासिकांतून संपादनाच

काम केलं किंवा कधी नियमित सदरे चालवली किंवा स्तंभलेखन केले. दैनिक नवभारत, वसुधा, दीपावली, किर्लोस्कर, पाक्षिक माणूस, साप्ताहिक नवयुग, दैनिक मराठा, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्र व्यवसायाने आपल्याला काय दिले. किंबहुना हा वृत्तपत्र व्यवसाय त्यांच्या एकंदरित वाङ्मयीन लेखकाला पूरक ठरला की, मारक यासंदर्भात विजय तेंडुलकर म्हणतात, ''वृत्तपत्र व्यवसायाने मला एक फार मोठी गोष्ट शिकवली आणि ती म्हणजे वाचकांसाठी लिहायचे, नाट्यलेखनातही आपल्याला प्रेक्षकांसाठी लिहायचं आहे. हे दडपण माझ्यावर कधीच आले नव्हतं. 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये मी 'कोवळी उन्हं' हे सदर लिहू लागलो तेव्हा दररोज एक स्तंभ लिहायचा, तो दैनिकाच्या विविध प्रकारच्या वाचकांना वाचायला लावायचा हे आव्हानच होतं. रोजच्या रोज स्तंभलेखन मी पूर्वी कधी केलं नव्हतं. त्यात वर्तमानपत्रांचा वाचक सर्वदूर पसरलेला, भिन्न भिन्न प्रकारचा असतो. नजरेत नसलेला असतो. इतक्या सगळ्यांना माझं सदर रोज वाचायला लावायचं म्हणजे एखाद्या नाटक कंपनीनं एकाच गावात रोज त्याच नाटकाचा प्रयोग नव्याने उठून करण्यासारखं वाटत होतं.''[२३]

स्तंभलेखनाच्या एकूण प्रकृतीमुळे ते इतर वाङ्मयप्रकारापासून वेगळे आहे. परंतु ललित निबंध, लघुनिबंध किंवा आत्मपर निबंध या निबंधाच्या शैलीला ते जवळचे आहे. लघु किंवा ललित निबंधलेखनाचा परिणाम स्तंभलेखनावर निश्चित झाला आहे आणि स्तंभलेखनातूनही अत्यंत दर्जेदार आणि वाचनीय लघु निबंध किंवा ललित निबंध निर्माण व प्रसिद्ध झाले आहेत.

## स्तंभलेखनाचे वाङ्मयीन गुण

वृत्तपत्रातून येणारे लेखन हे धांदलीतले वाङ्मय (लिटरेचर इन हरी) असे म्हटले जाते. ते घाईघाईत लिहिलेले असते हे जरी खरे असले तरी ते वाङ्मय आहे आणि जरी ते वाङ्मय असले तरी त्याला अभिजात वाङ्मयाचा दर्जा देता येतो का हा प्रश्नही विचारला जातो. याला कारण असे सांगितले जाते की एकतर हे लेखन कालरेषेच्या (डेड लाईन) मर्यादेत घडते. दुसरे म्हणजे या लेखनाला शब्दमर्यादा अपरिहार्य असते. ते फारसे विस्तृत लिहिता येत नाही. याशिवाय हे लेखन प्रयोजनमूलक आहे आणि बहुतेक वेळा तात्कालिक भाषा या दृष्टीनेही हे लिखाण वाङ्मयीन लेखनापेक्षा वेगळे वाटते.

स्तंभलेखन काहीवेळा त्यावेळी घडलेल्या घटनांवर, घटितांवर आधारित असते आणि त्यात कल्पकतेपेक्षा वास्तविकतेला जास्त महत्त्व असते. हे सर्व जरी खरे असले तरी सर्वच स्तंभलेखन

तात्कालिकतेच्या मर्यादेत अडकून राहते असे नाही. त्यातील काही लेखन दीर्घकाळ वाचकांच्या मनाचा ठाव घेऊ शकते आणि शब्दसंख्येच्या मर्यादेमुळे लेखक स्वत:ची अभिव्यक्ती दडवून न टाकता उलट आपले विचार अधिक नेमकेपणाने, थोडक्या शब्दात, अचूक मांडत असतो. म्हणजे अल्पाक्षरीत्व हा त्याचा दोष न ठरता ते त्याचे वैशिष्ट्य ठरते.

कोणतेही वृत्तपत्रीय लेखन हे कला आणि कारागिरी यांचे मिश्रण असते. त्यात कारागिरी असते तरी त्यातील कला दुर्लक्षित करून चालत नाही. प्रत्येक स्तंभलेखन हे लेखकाच्या शैलीमुळे वेगळे ठरलेले आहे. मराठी वृत्तपत्रातील 'संदेश'पासून आजपर्यंत अनेक लेखक-लेखिकांनी दर्जेदार स्तंभलेखन केले आहे. अनेक स्तंभलेखकांचा पिंडच वाङ्मयीन धाटणीचा होता. उदा. विजय तेंडुलकर, शांता शेळके, व्यंकटेश माडगूळकर, ह. मो. मराठे, आचार्य अत्रे, ग. त्र्यं. माडखोलकर यांचे शैलीदार, लालित्यपूर्ण आणि उपहासगर्भ स्तंभलेखन हे त्यातील वाङ्मयीन गुणांचे दर्शन घडवणारे आहे. एक वाङ्मयप्रकार म्हणून स्तंभलेखनाचे महत्त्व विजया राजाध्यक्ष यांनीही मान्य केले आहे. त्या म्हणतात, ''अलीकडच्या काही वर्षात सदर (स्तंभलेखन) हा वृत्तपत्रातील विशेषत: रविवार पुरवण्यांतील व साप्ताहिक मासिकांतील महत्त्वाचा घटक बनला आहे. आत्मचरित्र, चिंतनपर, विनोदी, सामाजिक, राजकीय स्वरूपाची, वाङ्मयीन, भाषा-संस्कृती विषयक अशी विविध स्वरूपाची सदरे प्रसिद्ध होतात आणि ती आवडीने वाचलीही जातात. वाचकांची ललित व वैचारिक अशा दोन्ही प्रकारांतील वाचनांची गरज त्यामुळे भागते. आजच्या धावपळीच्या घाईगर्दीच्या आयुष्यात वाचनासाठी राखून ठेवलेला किंवा ठेवता येणारा वेळ व या सदरांची लांबी यांचा हिशोब बरोबर जुळतो. वाचकांना वाचते ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी या सदरांनी पार पाडली आहे. यात काही शंकाच नाही. एरवी वेळ नाही या सबबीखाली पुष्कळ वाचन ही क्रियाच कदाचित विसरून गेले असते.''[२४]

सामान्य माणसाचे ग्रंथ वाचण्याचे प्रमाण कमी असते तर अभ्यासकही आपल्या विषयाचे व त्यास पूरक पोषक असेच ग्रंथ वाचतात. सर्वसामान्य माणूस ग्रंथ वाचण्याचा कंटाळा करतो. पण नियतकालिके, वृत्तपत्रे मात्र चाळताना आणि चाळून झाल्यावर आपल्या आवडत्या लेखांचे वाचन करायला तो कंटाळत नाही. उलट खुशीने तो हे वाचतो. कॉर्नर लायब्ररीज किंवा सर्क्यूलेटींग लायब्ररीज याची साक्ष देतील. नियतकालिकातील लेख जड किंवा बोजड नसतात. ते वाचताना वाचकाला विशेष बौद्धिक क्लेश होत नाहीत. उलट थोडीफार करमणूक होते आणि मनाला मोकळे

आणि बरे वाटते. संशोधक किंवा अभ्यासक सुद्धा काही वेळ स्वत:शी मोकळा होऊन अवती-भोवतीच्या जीवन व्यापाराकडे पहात असतो. अशावेळी नियतकालिके आणि वृत्तपत्रांतून येणारे विविध विषयातले स्तंभ त्यांच्या मदतीला येतात. नियतकालिके सहाय्यास येतात. ''एखाद्या मित्राप्रमाणे मनोविनोदन करतात, प्रसन्न करतात. ग्रंथ गुरू होत, तर नियतकालिके वृत्तपत्रे मासिक मित्र होत.''[२५] असे व. दि. कुलकर्णी यांना वाटते ते रास्तच आहे.

हे जरी खरे असले तरी सातत्याने आणि लोकप्रिय स्तंभलेखन करणाऱ्या लेखिका विजया राजाध्यक्ष यांनी लिहिलेल्या 'तळ्यात मळ्यात' या स्तंभलेखनाच्या ग्रंथरूपात स्वत:च लिहिलेल्या प्रास्ताविकेमध्ये स्तंभलेखनाच्या संदर्भात दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या म्हणतात, ''एक प्रश्न माझ्या मनात येतो. या प्रकारच्या सदर लेखनाला काही चिरस्थायी वाङ्मयीन मूल्य असते का? काही सदरे चिरकाल स्मरणात राहतात, हे खरे ! उत्तम कसाच्या लेखकांनी ती लिहिलेली असतात. ती पुस्तक रूपानेही उपलब्ध असतात. पण त्यात शब्दांशी गुणात्मक नाते जोडण्याऐवजी संख्यात्मक नाते जोडण्यावर भर असतो. ती सदर लेखनाची गरज असते. पण अखेर तो सारांश असतो. शब्दाचा कोश, सार नव्हे....''

नामवंत समीक्षक श्री. के. क्षीरसागर किंवा प्रभाकर पाध्ये केसरीच्या रविवार आवृत्तीत स्तंभलेखन करीत असतात. पंडित रविशंकर व अली अकबर खाँ यांच्या वाद्यसंगीतच्या जुगलबंदीपासून रजनीशांच्या तत्त्वज्ञानापर्यंत अनेक विषय क्षीरसागर यांच्या स्तंभलेखनात समाविष्ट झालेले दिसतात. त्यांच्या मार्मिक भाष्यामुळे त्यांचे स्तंभलेखन आजही वाचक आवडीने वाचतात. प्रभाकर पाध्ये यांचे केसरीतील स्तंभलेखन गाजले राजकारण, साहित्य, चित्रपट, संगीत या विषयावर जाणकारीने आणि चिकित्सकतेने ते लिहित असत. स्तंभलेखनाच्या तात्कालिकतेच्या मर्यादा ओलांडणारे हे लेखन त्यांच्या 'आस्वाद' या ग्रंथात समाविष्ट झाले आहे.

विजया राजाध्यक्ष यांनी उपस्थित केलेले दोन्ही प्रश्न मूलभूत आहेत. परंतु स्तंभलेखनाला त्यांनी वापरलेला शब्द सदरलेखन असा आहे. पण वस्तुत: ते स्तंभलेखनच आहे. त्यांचे 'तळ्यात-मळ्यात' हे लेखनसुद्धा दै. लोकसत्तामध्ये केलेले स्तंभलेखनच आहे. चिरस्थायी वाङ्मयीन मूल्य असते का ? त्याचे उत्तर स्तंभलेखनातून ग्रंथरूप घेतलेल्या अनेक ग्रंथांना मिळालेला प्रतिसाद आणि वाचकप्रियता आणि भागवत यांचे 'व्यासपर्व' व 'पैस', इरावती कर्वे यांचे 'परिपूर्ती', 'भोवरा', 'गंगाजळ', कृ. ग. दीक्षित यांचे 'षड्ज गंगाधर', केशवराव भोळे यांचे 'अंतरा', आनंद साधले

यांचा 'हा जय नावाचा इतिहास' ही सारी पुस्तके म्हणजेच उत्तमोत्तम साहित्य नियतकालिके आणि वृत्तपत्रांनी आपणास स्तंभलेखन रूपाने आधीच दिलेले आहे. आजच्या नामवंत लेखक, कवी, कथाकार, निबंधकार, एकांकिकाकार, समीक्षक, साहित्य विमर्शक, साहित्य संशोधक, भाषाभ्यासक यांपैकी बहुसंख्य लोक हे नियतकालिके किंवा वृत्तपत्रातील स्तंभलेखनातून पुढे आलेले आहेत. किंवा त्यातील बहुतेकांनी कोठेतरी स्तंभलेखन केलेले आहे. आणि त्या स्तंभलेखनाच्या स्तंभावरच पुढे मागे त्यांच्या एखाद्या पुस्तकांची इमारत उभी राहिली आहे.

व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शांता शेळके, स्वत: विजया राजाध्यक्ष, रवींद्र पिंगे, विजय तेंडुलकर यांसारख्या ख्यातनाम लेखकांचे स्तंभलेखन निर्विवादपणे वाङ्मयीन गुणवत्तेचे ठरले आहे. विजया राजाध्यक्षांचे 'अवती भवती' किंवा शांताबाई शेळके यांचे 'पाण्यावरच्या रेघा' ही अशीच वाङ्मयीन मूल्ये असणारी स्तंभलेखनाची ग्रंथरूपे आहेत. दैनंदिन अनुभवांकडे संवेदन-शीलतेने पाहिल्याच्या त्यांच्या वृत्तीतून आकाराला आलेली ही स्तंभलेखने आजही ताजी वाटतात.

आणखी एक प्रश्न : उत्तम नवीन लेखकांनी लिहिलेल्या सदरांतून निर्माण झालेल्या पुस्तकांचा त्या लेखकांचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना कितपत उपयोग होईल ? ती पुस्तके जमेला धरणे कितपत प्रस्तुत ठरेल ? ते संलग्न सहयोगी वाङ्मय खरेच पण तो मुख्य प्रवाहात सहज विलीन होईल असा प्रवाह असेल का ?''[२६]

विजया राजाध्यक्ष यांनी उपस्थित केलेला दुसरा प्रश्न आहे तो वाङ्मयीन मूल्यमापन करताना स्तंभलेखनातून निर्माण झालेल्या पुस्तकांचा कितपक उपयोग होईल ? स्तंभलेखन हे जर वाङ्मयीनदृष्ट्या सकस असेल तर त्यातून निर्माण झालेले ग्रंथरूप हे निश्चित वाङ्मयीन दृष्ट्या दर्जेदार असणार हे नक्की.

व्यंकटेश माडगूळकर यांचे रविवार केसरीतील स्तंभ 'पांढऱ्यावर काळे', रविवार सामनामधील 'सखा' त्यातील 'निसर्ग' गावाकडच्या आठवणी, अफलातून व्यक्तिमत्त्वे यामुळे फुलतात तर द. मा. मिरासदार 'गप्पांगण' हे स्तंभलेखन खुसखुशीत लेखनाचा नमुना ठरते.

मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांनी 'भाषाविवेक' नावाचा स्तंभ दै. लोकसत्तामध्ये वर्षभर दर आठवड्याला लिहिला आणि स्तंभलेखनाच्या शब्दमर्यादेत भाषा व भाषिक संस्कृतीचा व्यापक विचार त्यांनी मांडून मराठी वाङ्मयातील एक अप्रतिम ग्रंथ निर्माण केला.

अशा अनेक मराठी साहित्यिकांनी स्तंभ लेखन केले आहे आणि ते लेखन उत्कृष्ट वाङ्मयाचा नमुना ठरणारे आहे. साध्या अनुभवात आशय शोधणारे विजय तेंडुलकर यांची 'कोवळी उन्हे', 'रातराणी' यातील कोणताही लेख वाचताना त्यांच्या स्तंभलेखनाने तात्कालिकतेच्या सर्व मर्यादा ओलांडून ते सर्वकालीन संदर्भ असणारे वाङ्मय झाल्याची साक्ष पटते.

म्हणूनच स्तंभलेखनात एक सुबोधता, ताजेपणा असतो. परंतु त्याला वैचारिक बैठक असते. त्यात प्रबोधनाची क्षमता, लालित्य, शैली असते. या सर्वांमुळे त्याला वाङ्मयीन गुण प्राप्त होतो. त्यामुळे स्तंभलेखन हे वृत्तपत्रीय लेखन असुनही अक्षर वाङ्मय झाले आहे.

वरीलप्रमाणे 'स्तंभलेखन प्रेरणा, स्वरूप व व्याप्ती' या प्रकरणाचा अभ्यास करत असताना वृत्तपत्रामध्ये स्तंभलेखनाची प्रेरणा, स्तंभलेखनाचे महत्त्व, मराठी स्तंभलेखनाची वाटचाल, स्तंभलेखनाचा इतिहास याचा आढावा घेण्यात आला आहे. वृत्तपत्रातील संपादकीय लेखन, सदर लेखन, स्तंभलेखन यातील फरक स्पष्ट करीत असतानाच स्तंभलेखनाचे प्रकार, स्तंभलेखनाची पथ्ये, स्तंभलेखनाची वैशिष्ट्ये यांचाही अभ्यास करण्यात आला आहे. स्तंभलेखनाचा वाङ्मयीन अभ्यास करताना काही गाजलेल्या स्तंभलेखकांची माहिती, लोकप्रिय ठरलेली स्तंभलेखनाची पुस्तके आणि त्याची ललित / लघुनिबंधाशी असणारी जवळीक यातून स्तंभलेखनात दिसणारे वाङ्मयीन गुण याचा शोध या प्रकरणात घेतला गेला आहे.

## निष्कर्ष

१. आज रोजच्या जीवनामध्ये वृत्तपत्रांचे महत्त्व वाढत आहे. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे, दूरचित्रवाहिन्या यांचा वाढत असलेला प्रभाव या सर्वांमध्ये वृत्तपत्रे आपले स्थान टिकवून आहेत आणि ते विकसित स्वरूपात आपल्या पुढे येत आहे.

२. बातम्याखेरीज वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या इतर लेखनप्रकारामध्ये स्तंभलेखन हा महत्त्वाचा लेखन प्रकार आहे.

३. मराठी वृत्तपत्रामध्ये स्तंभलेखन ही संज्ञा जरी अलीकडे वापरात आली असली तरी स्तंभलेखन हा प्रकार निबंध, वैचारिक निबंध, लघुनिबंध, ललित निबंध या नावाने तर कधी सदर लेखन या नावाने लिहिले जाते. मराठीतील स्तंभलेखनाला जवळपास दीडशे वर्षांची परंपरा आहे.

४. अमेरिकेमध्ये १८९० मध्ये 'शिकागो डेली' या वृत्तपत्रातील शार्प्स अॅन्ड फ्लॅटस् या नावाखाली 'युजिन फिल्ड' या लेखकाने केलेल्या लेखन प्रकारामुळे प्रकार स्तंभलेखन या संज्ञेने प्रथमच ओळखला जाऊ लागला.

५. चांगल्या स्तंभलेखनाचा उपयोग वृत्तपत्राचा खप वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

६. पहिल्यांदा सदर लेखन मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होत होते. त्या नावाखालीच स्तंभलेखनही प्रसिद्ध होत होते.

७. सदर लेखनातील मजकूर हा अनेक लेखकांनी किंवा रोज वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेला असू शकतो. मात्र स्तंभलेखन ठराविक दिवशी, एकाच लेखकाने लिहिलेले, ठराविक पानावर, ठराविक जागी प्रसिद्ध होणारे लेखन आहे.

८. स्तंभलेखनाची निश्चित व्याख्या सांगता येत नाही. त्यामुळे स्तंभलेखनाची काही वैशिष्ट्ये आहेत की स्तंभलेखन हे इतर वाङ्मयीन लेखन किंवा वृत्तपत्रीय लेखन यापेक्षा वेगळे ठरते.

९. बऱ्याचवेळा तत्कालीन घटनांवर केलेले लेखन होय. संपादकीय आणि स्तंभलेखन यामध्ये मूलभूत फरक असतो.

१०. स्तंभलेखनाचा प्रारंभ 'प्रभाकर' (१९८१) पासून झालेला दिसतो. त्यानंतर अनेक वृत्तपत्रांमध्ये स्तंभलेखनाचा अंतर्भाव केलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात दै. 'लोकसत्ता', दै. 'केसरी', दै. 'सकाळ' यांनी स्तंभलेखनाला एक नवा चेहरा मिळवून दिला.

११. स्तंभलेखनाची लेखन, विषय, आशय, भाषा आणि आविष्कार या संदर्भात वेगळी वैशिष्ट्ये असल्यामुळे अशा स्वरूपाचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

१२. स्तंभलेखनामध्ये ललित लेखक, परिवर्तनवादी लेखक, क्रीडाविषयक लेखक, विनोदी लेखक यांचीही स्तंभलेखने आणि त्यांची पुस्तके गाजली आहेत.

१३. मराठीमध्ये अनेक लेखकांची स्तंभलेखने ही तत्कालिकतेच्या मर्यादा ओलांडून गाजलेली आहेत. माधव गडकरी, शांता शेळके, विजय तेंडुलकर यांच्या स्तंभलेखनाला नंतर ग्रंथरूपानेही वाचकप्रियता लाभली. त्यानंतर स्तंभलेखनाची ग्रंथ रूपात प्रकाशने झाली आणि गाजली.

१४. स्तंभलेखन हा लेखनप्रकार ललित लघुनिबंध या प्रकाराच्या जवळचा प्रकार आहे. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, विजय तेंडुलकर, विजया राजाध्यक्ष यांनीही स्तंभलेखन हे ललित किंवा लघुनिबंध, आत्मपर निबंध असल्याचे म्हटले आहे.

१५. स्तंभलेखनामध्ये ललित लेखक परिवर्तनवादी लेखक, क्रीडाविषयक लेखक, विनोदी लेखक यांचीही स्तंभलेखने व पुस्तके गाजली.

१६. स्तंभलेखन आपल्या तात्कालिकतेच्या मर्यादा ओलांडून ग्रंथरूपाने कायम वाचकप्रिय ठरल्याचे अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे स्तंभलेखकाने स्तंभलेखनाचा वाङ्मयीन दर्जा अनेक प्रकारे सिद्ध केलेला दिसतो.

15930

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १. | खोरे अरुण (२००२) | 'मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये', पृ. क्र.५८ |
| २. | तत्रैव | पृ. क्र. ५८ |
| ३. | पवार सुधाकर, येवलेकर अनंत (१९९१) | 'वृत्तपत्र संवादाचे स्वरूप' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. क्र. ४२ |
| ४. | खोरे अरुण (२००२) | 'मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये',उनि., पृ. क्र.५८ |
| ५. | खोरे अरुण (२००२) | 'मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये',उनि., पृ. क्र.५८ |
| ६. | अकलुजकर प्रसन्नकुमार (२०००) | 'वृत्तविद्या', श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृ. क्र.३६ |
| ७. | तत्रैव | पृ. क्र. ४८ |
| ८. | गोखले ल. ना., जोशी भालचंद्र (२००२) | 'संपादक - कार्य आणि जबाबदारी', 'भाषा व भाषांतर', यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. क्र. ५ |
| ९. | पाटील विलास (२००५) | 'वाङ्मयधारा', झुंजार प्रकाशन, कोल्हापूर, पृ. क्र. २४६ |
| १०. | गोखले ल. ना., जोशी भालचंद्र (२००२) | 'संपादक - कार्य आणि जबाबदारी', 'भाषा व भाषांतर', उनि. पृ. क्र. ४९ |
| ११. | पवार सुधाकर, येवलेकर अनंत (१९९१) | 'वृत्तपत्र संवादाचे स्वरूप', उनि., पृ. क्र. ४२ |
| १२. | खोरे अरुण (२००२) | 'मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये', उनि. पृ. क्र. ६० |
| १३. | तत्रैव | पृ. क्र. ६० |

१४. गायकवाड सुरेश (२००२) 'संकल्प', श्री ज्योती प्रकाशन, पुणे, प्रस्तावना

१५. अकजुलकर प्रसन्नकुमार (२०००) 'वृत्तविद्या', उनि., पृ. क्र. १२२

१६. काणेकर अनंतर (संपा. वि. स. खांडेकर) (१९९६), 'नवे किरण', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, दिग्दर्शन (संपादकीय)

१७. खांडेकर वि. स. (१९७७) 'पांढरी शिडे', प्रास्ताविक, पृ. क्र. ४२

१८. वर्तक चंद्रकांत, राणे शरद (१९९७) 'ललित गद्य', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. क्र. ५

१९. पाटील विलास (२००५) 'वाङ्मयधारा', झुंजार प्रकाशन, कोल्हापूर, पृ. क्र. १४०

२०. काणेकर अनंत (संपा. वि. स. खांडेकर) (१९९६), 'नवे किरण', उनि.

२१. शेळके शांता ज. (१९८९) 'एक पानी', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, पृ. क्र. १२

२२. राजाध्यक्ष विजया (१९९७) 'तळ्यात मळ्यात', ललित गद्य, उनि, पृ. क्र. १४

२३. पै शिरीष, तेंडुलकर प्रिया (संपा) (१९८८) 'विजय तेंडुलकर साहित्यातून साहित्याकडे', डिंपल पब्लिकेशन, वसई रोड, ठाणे, पृ. क्र. ५१९

२४. राजाध्यक्ष विजया (१९९७) 'तळ्यात मळ्यात', ललित गद्य, उनि, पृ. क्र. ११

२५. कुलकर्णी व. दि. (१९८७) 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन इतिहास', मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ५८

२६. राजाध्यक्ष विजया (१९९७) 'तळ्यात मळ्यात', ललित गद्य, उनि, पृ. क्र. १४


-----x-----